# आजचा सुधारक

विवेकवादी चिंतनाला वाहिलेले मराठी मासिक

**वर्ष 26** **अंक 2** **मे 2015**

**या अंकात**

2 ‘साडेसाता’ळलेले, 'शन्याळ’लेले दिङ्मूढ प्राणी ....*प्रबोधनकार ठाकरे*
2 भ्रष्टाचाराचे अ (न)र्थशास्त्र! ..... *प्रभाकर रघुनाथ जोशी*
4 नीतीची मूलतत्त्वे (उत्तरार्ध) ......*अशोक गर्दे*
9 ‘एक लढाई, जी बांगला देशने जिंकलीच पाहिजे’.... *मेह्फ़ुझ़ अनाम*
11 विवेकवाद हीच खरी नैतिकता !.....*राम जगताप*
13 आजचं भारतीय तारुण्य नेमकं आहे कसं?...... *चिन्मय लेले*
15 इहवादः मानवी प्रतिष्ठेचा महाप्रकल्प ....... *यशवंत मनोहर*
21 विषमतेची भारतीय स्थिती ......*देवेंद्र इंगळे*
24 प्रबोधन परंपरेची पीछेहाट ...... *सुहास कुलकर्णी*
26 आरोग्य व्यवस्थेचा पंचनामा .......*डॉ .भालचंद्र कानगो*
27 “विचारां”चा विचार ........*प्रसन्नजीत माने*

संस्थापक – संपादक
**दि. य. देशपांडे**
(1918-2006)

कार्यकारी संपादक
**प्रभाकर नानावटी**

**संपर्कः**
प्रभाकर नानावटी pkn.ans@gmail.com 9503334895
भरत मोहनी bharat_i@yahoo.com 9822736808
aajacha.sudharak@gmail.com

# साडेसाताळलेले, 'शन्याळलेले ' दिङ्मूढ प्राणी

'कुंडल्या कागदी असोत, नाही तर तळहाती असोत; त्यात चितारलेल्या प्रारब्ध-मर्यादेबाहेर मनुष्याला केव्हाही जाता येणार नाही. त्यातील भोग भोगल्याशिवाय सुटका नाही', हा प्रवाद जर खरा मानला, तर मनुष्याच्या पुरुषार्थाला वाव तरी राहिला कोठे? सगळाच जर दैववाद, तर यत्नवाद हा शब्द जन्मला तरी कधी? आणि का? आणि कोणाकोणाच्या पोटी? बरे, प्रत्येकाचे दैव आणि सुखदु:खाचे फेरे हे जर घड्याळातल्या यंत्राप्रमाणे ठाकठीक आणि यथाकाळ, यथाक्रम घडणारे, तर त्यासाठी माणसाने आपले हात-पाय तरी का हलवावे? दु:ख येणार तर ते अगत्य येणारच येणार आणि सुखाचा मुसळधार पाऊस अमुक वेळी कोसळणार म्हणजे धो धो कोसणारच. असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी! मग मला हात-पाय हलविण्याची जरूर काय? दैववाद्यांचे विचार जवळजवळ असेच असतात. नवल वाटते ते हेच की, या कपाळवाद्यांनासुद्धा आढ्याला तंगड्या लावून स्वस्थ मात्र बसवत नाही. त्यांची काही ना काही धडपड चाललेलीच असते.. मग हे प्राणी आजूबाजच्या परिस्थितीचा, स्वत:च्या प्रवृत्तीचा, अंतस्थ धमकीचा, कार्यकुशलतेचा, कार्यकारण संबंधाचा, हातातील विहित कर्तव्याचा, कशाचाही कधी विचार करायचे नाहीत.

'आत्मशोधनाची आणि सत्यशोधनाची प्रवृत्ती शेकडा ९९ लोकांत सहसा नसते. ..अर्थात, सत्यशोधक प्रवृत्तीच्या अभावामुळे बहुतेक सारे साडेसाताळलेले लोक पृथ्वीवरील या जिवंत शनिच्या हातात शेणगोळ्या-मेणगोळ्याप्रमाणे हवे तसे दाबले-फुगविले जातात. बाधा शनिची, पण तेल-शेंदराचा अभिषेक मारुतीच्या मस्तकावर काय म्हणून? काय, मारुती म्हणजे शनि? का, शनिचा वकील? या पृथ्वीवरील एजंट? शनिचे चरित्र काय! मारुतीचे चरित्र काय!! कशास काही मेळ? पण असला एकही प्रश्न बिचाऱ्या शन्याळलेल्या दिङ्मूढ प्राण्यांना कधी सुचायचा नाही.

प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे

•••

# भ्रष्टाचाराचे अ(न)र्थशास्त्र!

*प्रभाकर रघुनाथ जोशी*

*नीती अर्थकारण*

लोकशाहीने आपल्या समाजाला काही चांगले, काही वाईट दिले. त्याबाबत चर्चा होऊ शकते. त्या चर्चेचा निष्कर्ष निरनिराळ्या पद्धतीनी निघू शकतो. मात्र भारतातली एक चिंताजनक अशी बाब म्हणजे भ्रष्टाचाराची. आपल्याकडची लोकशाही आणि त्यातून निर्माण झालेले राजकारण भ्रष्टाचाराला आळा घालू शकले नाही, हे विदारक सत्य होय. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या पहिल्या दोन दशकात भारतात भ्रष्टाचाराचे प्रमाण माफक होते. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात नमूद केल्याप्रमाणे कोणत्याही समाजव्यवस्थेत भ्रष्टाचार होत असतोच आणि तो टाळता येण्यासारखा नसतो. त्या समाजातील पुढाऱ्यांनी आणि शासनकर्त्यांनी तशा व्यवहाराचे प्रमाण माफक असेल याची खबरदारी घ्यायची असते. भारतात तसे झाले नाही.

सत्तरीनंतर हळूहळू भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढू लागले. एक तर भारतात आर्थिक प्रगती होत असल्यामुळे भरपूर भांडवल गुंतवले जात होते. नवनवे प्रकल्प हाती घेतले जात होते. त्यामुळे भ्रष्टाचाराला वाव होता. त्याचा फायदा भारतातील समाजद्रोही मंडळी घेऊ लागली. नंतर तर त्याचे प्रमाण इतके वाढले की भारतीय नागरिक भ्रष्टाचार

आपल्या समाजव्यवस्थेचा एखादा महत्वाचा घटक आहे की काय असे मानू लागले. त्याविरुद्ध आवाज उठवणे, त्याकरिता मोहिम सुरु करणे आणि लाच-वुचपतीला प्रतिकार करणे ही प्रक्रिया थांबली, असे दिसू लागले. अधूनमधून भारत सरकारतर्फे काळा पैसा व समांतर अर्थव्यवस्था या विषयावर समित्या नेमून त्याच्या शिफारशीनुसार कारवाई करण्यात आली. त्यानंतर बऱ्याच समित्याचा भर स्वेच्छा कबुली आणि प्रगटीकरण (voluntary disclosure) करण्यावर होता. ज्यांच्याकडे काळा पैसा आहे त्यांनी स्वेच्छेने आपले उत्पन्न व संपत्ती जाहीर करावी, त्यांना कोठलेच प्रश्न विचारले जाणार नाहीत, असे अभयदान दिले जायचे. त्यातून काही मंडळीनी आपला बेहिशोबी कारभार जाहीर केला, पण त्यामुळे मोठ्या प्रमाणावर या प्रकाराला आळा बसला नाही. त्यांना भयच नसते,तर अभयदानांचे आमिष काय कामाचे?

मागणी, पुरवठा यांचा विचार करताना घाऊक पातळी व किरकोळ पातळी या बाबी तपासता येतात. स्वतंत्र भारतात अशा रीतीने निरनिराळे कायदे करण्यात आले आहेत की सामान्य नागरिकांना दैनंदिन व्यवहाराकरिता शासनाची परवानगी लागते. वीजपुरवठा, दूरध्वनी सुविधा, घरपट्टी भरणा, आयकर विवरणापत्रे इत्यादी त्यांतल्या महत्वाच्या बाबी म्हणता येईल. त्याकरिता निरनिराळ्या शासकीय कार्यालयांकडून लेखी परवाना घ्यावा लागतो. असा परवाना मागणाऱ्यांची संख्या खूपच असते. सतत वाढत असते. हेच सामान्य नागरिक आपली कामे जलद गतीने व्हावीत म्हणून लाच द्यायला तयार असतात, कमी जास्त प्रमाणात लाच देतातही. भारतातली शासकीय खाती अशी आहेत की त्या खात्यामधल्या कर्मचाऱ्यांना अतिशय कमी प्रमाणात वेतन मिळते. वेतन कमी, कामाचा बोजा वाढलेला, लाच देणारी मंडळी समोर, अशा परिस्थितीत भ्रष्टाचार उद्भवतो. ती किरकोळ पातळी झाली.

मोठ्या आणि घाऊक प्रमाणावर भ्रष्टाचाराला मागणी असते, पुरवठा असतो. भारतातल्या राजकीय पक्षांना त्यांच्या पक्षकार्याकरिता विशेषतः निवडणूक लढवण्याकरिता, निधी लागतो. त्यांना निधी जमा करायची अधिकृत सोय नसल्याने अनधिकृत मार्गांनी तो पैसा गोळा केला जातो. या विषयावर चर्चा झाली, औद्योगिक कंपन्यांनी किंवा शासनातर्फे वैध मार्गांनी देणग्या द्याव्यात असा सूचना केल्या गेल्या. पण अजून तरी त्याबाबत राजकीय पक्षांचे एकमत झालेले नाही आणि भ्रष्टाचाराकरिता आणखी एक निमित्त मिळाले आहे.

तसाच एक घाऊक प्रकार औद्योगिक कंपन्यांना लागणाऱ्या निरनिराळ्या परवान्यांच्या निमित्ताने उद्भवत असतो. नवे उद्योग स्थापन करणे, जुन्या उद्योगांची वाढ करणे इत्यादी औद्योगिक प्रकल्पांकरिता सरकारी यंत्रणेकडून बरेच परवाने लागतात. नव्वदीपर्यंत तर ती सर्व प्रक्रिया कडेकोट सरकारी नियंत्रणाखाली होती. त्यानंतर सरकारी नियमावली शिथिल झाली असली तरी शासकीय ढाचा थोड्याफार फरकाने तसाच राहिलेला आहे. हे परवाने मिळवण्याकरिता लाच देण्याकडे प्रवृत्ती निर्माण होते. सरकारी नियमावली इतकी किचकट, गुंतागुंतीची व वेळखाऊ असते की भ्रष्टाचाराकरिताच ती तयार झाली की काय असे वाटावे!

भारताची भ्रष्टाचाराबद्दलची ख्याती भारताबाहेरही परिचित आहे. जागतिक पातळीवरील काही संस्था (Transparency International) या विषयावर पाहणी करून, ज्या त्या देशातल्या महत्वाच्या अधिकाऱ्यांच्या मुलाखती घेऊन आपली नीरिक्षणे आणि निष्कर्ष जाहीर करत असतात. त्यांच्या पाहणी अहवालामध्ये भारताचा बराच वरचा क्रमांक लागतो. ज्या देशाला इतका मोठा इतिहास आहे, संस्कृती आहे उच्च परंपरा आहेत त्या देशाची अशी अवस्था व्हावी, याबद्दल भारताबाहेरही हळहळ व्यक्त केली जाते.

भ्रष्टाचारामुळे भारतीय समाजजीवन किती मार्गांनी विसकटत आहे याची कल्पनाच केलेली बरी. गेल्या वीस वर्षांचा य संदर्भात हिशोब केला तर आपण किती मागे पडलो आहोत याचा अंदाज बांधता येतो. भ्रष्टाचारामुळे चुकीचे अंदाज घेतले जातात, चुकीचे आर्थिक निर्णय घेतले जातात, चुकीचे तंत्रज्ञान निवडले जाते, गुंतवणूक प्रक्रिया थंडावते. कर-आकारणी आणि वसूली अपुरी होते, इत्यादी चिंताजनक बाबी या संदर्भात नोंदवता येतील.

तर हे असे भ्रष्टाचाराचे अर्थशास्त्र! हे तर अनर्थशास्त्र होय. हे भारतातून हद्दपार झाले पाहिजे. भारतीय नागरिकांनी एक साधी प्रतिज्ञा केली आणि कोणत्याही सबबीखाली कोणालाही लाच द्यायची नाही असा निश्चय केला तरी बरेच काही साध्य होईल.

('भारताचा भविष्यवेध' या पुस्तकातून)

•••

# नीतीची मूलतत्त्वे (उत्तरार्ध)

*अशोक गर्दे*

*नीती समाजकारण*

**आजच्या समाजातील नीतिमत्ता**

समाजातील विचारवंतांचे आणि सामान्य माणसाचे आपल्या आजच्या नीतिमत्तेविषयी मत साधारण असे असते," काय बघा कुठे चालला आहे आपला समाज! कुणालाही नीतीची चाड म्हणून राहिलेली नाही.आपल्या संस्कृतीचा असं ह्रास पिढ्या न पिढ्या चालू राहिला तर भविष्यात कसे होणार?"

खरोखरच, सर्वसामान्य माणूस नीतीने वागतो का? याचे उत्तर मिळविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर सर्वेक्षण केले तरी खरे उत्तर मिळणे कठीण. अनैतिक वागणारे सुध्दा " मी नैतिकतेनेच वागतो." अशा तऱ्हेचा प्रतिसाद देतील! पण सामाजिक नीतिमत्ता तपासून बघण्यासाठी एक सोपी पद्धत आहे, ती अनेकवेळा वापरलेली आहे.

साधारण ५०-६० स्त्री पुरुषांच्या गटाला एक प्रश्न विचारला. " भारतातील सर्व निरक्षर ते सुशिक्षित अठरा वर्षांवरील स्त्री व पुरुष यांचा विचार करा व तुमचे प्रामाणिक मत द्या. किती टक्के व्यक्तींच्या किती टक्के कृती सद्वृत्तात मोडतील? हा केवळ अंदाज असणार आहे; पण तरी सुद्धा तो करा व तुमच्या मते काय 'खरे' असावे ते खालीलपैकी एक पर्याय निवडून सांगा."

| पर्याय | % व्यक्ती | % कृती |
|---|---|---|
| १ | ८० | ८० |
| २ | ६० | ६० |
| ३ | ४० | ४० |
| ४ | २० | २० |

जर तुम्हाला वाटत असेल की ८० टक्के माणसांच्या ८० टक्के कृती नैतिकतेला धरून केलेल्या असतात, तर पर्याय १ निवडा.

गटातील बहुमत २०x२० या ४थ्या पर्यायास मिळते. एखाद दुसराच ८०x८० दाखवतो, तर बरेच म्हणतात की १०x१० च जास्त शक्य आहे! मात्र ९०x९० चा पर्याय ठेवा असे कोणीच म्हणत नाहीत. निदान १४ गटामध्ये असा 'खेळ' केलेला आहे आणि वरील निकालाचे आकडे ही त्यांची सरासरी आहे.

आता ९०x९० चा अर्थ समजून घेऊ या. याचा अर्थ होतो की दर १०० कृतींमधील १९ कृती सद्वृत्ताला सोडून असतील. [१००.० -१००(०.९०x०.९०) =१०० -८१=१९)] म्हणजे तुमची स्कूटर दर ५ दिवसातून एकदा चोरली जाईल! अहो, अगदी ९९.९x९९.९ असा पर्याय घेतला तरी ५०० तून एक वेळा चोरी होईल. म्हणजे दर दीड वर्षांनी तुमची स्कूटर चोरली जाईल. असे काही होताच नाही हे आपल्याला ठाम पणे माहित आहे. या वरून तितक्याच ठामपणे निष्कर्ष निघतो तो असा:

**"आजच्या आपल्या समाजात नैतिकता ओतप्रोत भरलेली आहे. सर्व जण सर्वकाळ नीतीनेच वागतात."**

आता आली का पंचाईत? विवेकवादाचा निकाल एक, आणि आपल्या सर्वांना वाटते ते अगदी त्याच्या विरुद्ध! हा एक प्रचंड विरोधाभास आहे, नाही का?

**प्रचंड विरोधाभास**

असा विरोध दिसण्यामागे सहा – फक्त सहाच – कारणें आहेत, ती बघूया.

1. <u>जीवनात उत्तीर्ण व्हायला १०० टक्के मिळवावे लागतात</u>: शाळा महाविद्यालयातून शिकताना ३५ -५० टक्के गुण मिळाले तरी भागते, पण जगण्यासाती गुण १०० टक्केच लागतात. एखाद्या ५० लाख वस्तीच्या शहरात रोज ४-६ माणसे रस्त्यावरील अपघातात मेली तर चालेल? माणूस अश रीतीने मारण्याची शक्यता साधारण १० कोटीमध्ये १ इतकी नगण्य असते. पण आपल्याला ती फार मोठी वाटते, अगदी चालत नाही, खरे ना?

2. <u>प्रसारमाध्यमांचा प्रभाव:</u> 'वाईट' ह्या बातम्या होतात.'प्रेयसी कडून होकार न मिळाल्याने तिच्या चेहेऱ्यावर आम्ल फेकले' असले ठळक मथळे वर्तमानपत्र व दूरदर्शनवर सतत दिसत असतात.असे प्रकार घडण्याची शक्यता ही अपघाताप्रमाणेच कोटीत एक अशी कमी असते. पण प्रसिद्धीमुळे हे प्रकार फार मोठ्या प्रमाणात घडत आहेत असे वाटते. जीवनात १००% चांगले हवे असल्याने अशा वाईट घटना घडूच नये ही योग्य अपेक्षा असते.

3. <u>दुःख लक्षात राहते:</u> दुःख देणाऱ्या आणि वाईट गोष्टी मनावर आघात करीत असल्याने फार काळ लक्षात राहतात. चांगल्या गोष्टी व सुखकारक अनुभव मनात फार टिकत नाहीत हा मनुष्य स्वभाव आहे. त्यामुळे वाईट अनैतिक गोष्टी एकमेकांना सांगितल्या जाऊन सतत मनावर ठसत राहतात.

ही तीन कारणे 'नीतिमत्ता नाही' असा आभास उत्पन्न करणारी आहेत. परंतु खालील तीन कारणे मात्र खरी आहेत, आभास नाहीत.

4. <u>लहान-सहान गैर वर्तन</u>: कामावरून कागद-पेन्सील घर आणून वापरणे (चोरी), उशीर झाल्यावर थाप मारणे (खोटे बोलणे), सायकल रस्त्याच्या उलट्या बाजूस चालविणे (कायदा तोडणे) अशा प्रकारची छोटी, थोडी कमी छोटी अनैतिक वर्तणूक सर्रास केली जाते. अशा लाखो वाईट कृती आजूबाजूला आणि स्वतः कडून पण घडत असतात. परंतु अशा वाईट गोष्टींनी समाजाला त्रास फार होत नाही व त्यांमुळे नुकसान पण कमी होते. असे वाईट न वागणे अर्थात चांगले असते व आपण सर्व ते अनेकदा करत असतो.

5. <u>भ्रष्टाचार:</u> जे करणे अयोग्य ते करणे म्हणजे 'भ्रष्ट' 'आचार'; आपण लाच-लुचपत आणि कर-चोरी या दोन्ही वाईट कृतींना भ्रष्टाचार म्हणतो.भारताच्या सार्वजनिक जीवनात या दोन्हींचा सुळसुळाट झालेला आहे. त्याची झळ सर्वांना लागते. गरीबी रेषेच्या खाली असलेल्या माणसाला रेशन कार्ड घ्यावयाचे असेल तर रु. १००-२०० लाच द्यावी लागते! दुसऱ्या टोकाला दरमहा २-४ लाख रुपये कमावणारा डॉक्टर भरपूर कर-चोरी करतो, रुग्णाकडून रोकड पैसे मागतो. या दोन्ही अनैतिक वर्तणूकीविषयी आपण पुढील भागात विचार करू.

6. गुन्हे: चोऱ्या, दरोडे, खून, बलात्कार इत्यादी एक प्रकारचे गुन्हे आणि अफरातफर, खोटे दस्ताऐवज बनवणे, रोखेदाराना फसवणेइत्यादी प्रकारचे मोठे गुन्हे प्रत्येक समाजात घडत असतात. असे गुन्हे घडण्याची शक्यता पण अगदी कमी (कोटीत एक) असते. गुन्ह्यांचे परिणाम जवळच्या अनेकांना भोगावे लागतात हे खरे, पण त्यांचा लोकजीवनावर मोठा परिणाम होत नाही. तेव्हा हे सर्व गुन्हे अत्यंत वाईट आहेत हे कळत असूनही सामाजिक नीतिमत्तेच्या संदर्भात त्यांचा विचार करावयाची जरूर नाही.

"हे सगळं ठीक आहे हो, पण अजून नाही पटत की समाजात सर्व लोक चांगुलपणाने वागतात." अशी प्रतिक्रिया अनेकांची असणार हे पण खरे! पण हा निष्कर्ष तुम्हा आम्हाला नवीन वाटत असला तरी तो भरपूर जुना –प्राचीन म्हटले तरी चालेल –कारण तो साधारण ५००० वर्षांपासून माहीत आहे! हे सत्य कसे छान व्यक्त केलेले आहे ते पाहूया.

**न राज्यम् न च राजा अपि न दण्डो न च दाण्डिकाः**
**धर्मेण इव प्रजाः सर्वाः रक्षन्ति हि परस्परम्**

*(नाही राज्य, नाही राजा, नाही कायदा, नाही पोलीस; धर्माने वागूनच सर्व प्रजाजन रक्षण करतात परस्परांचे. - महाभारत)*

येथे धर्म हा शब्द नैतिकता –सदवृत्त –या अर्थाने वापरलेला आहे, उपासना पद्धती या अर्थाने नाही, हे चटकन कळते.

अजून खरे वाटत नाही? विचार करा: समजा समाजातील फक्त १० टक्के लोकांनी ठरवले की 'फक्त चोरी करूनच जगण्याची साधने मिळवायची" तर चोऱ्या होऊ नयेत म्हणून किती पोलीस ठेवावे लागतील? चोरी करायला इतक्या संधी असतात की त्यांची मोजणी कारणे अशक्यच आहे. तरीही अगदी गरीब माणसे सुध्दा चर्या करीत नाहीत. कष्ट करून, थोडे फार कमावून 'सन्मानाने' जगतात. जरूर पडली तर कांही लोक भीक मागतात, पण सर्रास चोऱ्या करीत नाहीत.

आपणा सर्वांवर –सुशिक्षित व अशिक्षित – जे संस्कार लहानपणापासून होत असतात, त्यांत –सदाचारात – मोडणारे अनेक संस्कार समाजाला तारक असतात म्हणूनच समाज तगतो. समाजातील सर्व जण एकमेकास स्माभाळून घेतात, सद्वृत्ताने वागतात म्हणूनच समाज उभा राहतो, टिकतो आणि प्रगती करतो. आधुनिक प्रगत राष्ट्रातील समाजांत भ्रष्टाचार खूप कामी झालेला आहे. तसा तो भारतात पण अगदी कमी होण्यासाठी तो का व कसा होतो, किती होतो व काय केल्याने कमी होतो हे जाणणे आवश्यक आहे. नीतिमत्ता कशी मोजावी व सुधारावी हे आपण पाहू.

**भ्रष्टाचाराचा बीमोड**

नीतिमत्ता ही नुसती विचार करण्याची गोष्ट नाही. नितीवरील पुस्तकी ज्ञान कुचकामी ठरते. नीतीची तत्वे जी व्यक्ती व्यवहारात पळते तीच खरी नीतिमान असते. नीतीवर व्याख्यान देऊ शकणारा किंवा देणारा नीतिमान ठरत नाही; त्याची वागणूक ठरवते. रोजच्या व्यवहारात प्रत्येक कृती सद्वृत्ताला धरून करण्यासाठी जागरूक असावे लागते,त्यामागे निश्चय लागतो व निर्भयता पण जरूर असते. मन कणखर ठेवायाचे असते आणि प्रसंगी समाजाच्या टीकेला तोंड द्यायचे धैर्य पण असावे लागते.

मागील लेखात आपण 'लहान सहान' अनैतिक कृती बघितल्या. त्या पण न करण्यासाठी स्वतः वर भरपूर ताबा ठेवावा लागतो, आणि तो तसा आपल्यापैकी अनेक ठेवत पण असतात. मात्र लाच- लुचपत व कर-चोरी पासून दोर राहण्यास मजबूत चारित्र्य लागते.

कांही म्हणतील कि सद्वृत्ताच्या व्याख्येप्रमाणे 'लाच देणे' वाईट नाही, कारण देणारा व घेणारा दोघेही 'खुष – सुखी' असतात! आणि बाजूंची अदलाबदल झाली तरी खुष राहतात!! पण हे खरे नाही. लाच देणाऱ्यावर ती देण्यासाठी दबाव असतो व लाच नाईलाज म्हणून द्यावी लागते. लाच दिल्याने 'लवकर/सुरळीत' काम होते याचा

अर्थे इतरांचे आधी आलेले/ महत्वाचे काम न करता लांच देणाऱ्याचे काम आधी केले जाते. एकाच्या फायद्यासाठी इतर अनेकांवर अन्याय हा सद्वृत्तात कसा बसणार?

भारतात १९९५ आधी भ्रष्टाचार सर्व क्षेत्रांत बोकाळला होता. मात्र २१ व्या शतकात तो खाजगी क्षेत्रातून मोठ्य्स प्रमाणावर नाहीसा झाला आहे. इ.स.२००५ नंतर उद्योग जगतामध्ये मध्ये अतिशय तीव्र स्पर्धा निर्माण झालेली आहे. जो उद्योग चांगला माल/सेवा पोसेल इतक्या किमतीत देऊ शकत नाही, तो मरतो. जगातील अनेक देशांत आढळून आले आहे की खुल्ली बाजारपेठ असलेल्या अर्थव्यवस्थेत उत्पादन भरपूर वाढते व खासगी क्षेत्रांत भ्रष्टाकार नाहीसा होतो. भारतात पण हे बऱ्याच प्रमाणात झाले आहे: पण प्रगतीला भरपूर वाव आहे. मात्र सार्वजनिक क्षेत्रांत भ्रष्टाचार कमी होणे कठीण असते. सर्वांचे हात ओले होत असल्याने, नोकरी जाण्याची भीती नसल्याने व कामाचे 'खाते' कधी मरण न पावणार असल्याने भ्रष्टाचार जोरात फोफावतो. भरपूर कमी, पकडले जाण्याची शक्यता कमी, पकडले गेल्यास न्यायालयात पुरेसा पुरावा मिळून शिक्षा होण्याची शक्यता अगदी कमी, अशी परिस्थिती सध्या आपल्या देशात आहे हे आपण जाणतो.

हजारो ठिकाणी अनेक रीतीने भष्ट्राचार चालु असला तरी त्याचे प्रकार मात्र फक्त सहाच आहेत: जल्दी पैसे, त्रास-बचाव पैसे, शिक्षेतून सुटका , खोटी दलाली, नियम/कायदा तोडणे, व वशिलेबाजी. (कर-चोरी आपण वेगळी पाहू.)

<u>जल्दी पैसे</u>: जे मिळणे स्वतःच्या हक्काचे असते ते लवकर व फार कटकट न होता मिळावे यासाठी द्यावे लागत असणारे पैसे. उदा: निवृत्तीनंतर भविष्यनिधी मिळवण्यासाठी टेबलाखालुन दिलेले पैसे.

<u>त्रास-बचाव पैसे</u>: तुमच्या उद्योगात/व्यवहारात उगीच 'कायदेशीर' खुसपटे काढून तुम्हाला कोर्ट-कचेरीत अडकून पडणे नको आहे? द्या दरमहा योग्य हप्ता कारखाना तपासनीसाना आणि पोलिसांना.

<u>खोटी दलाली</u>: 'तुमचा माल आमच्या खात्याने खरीदावा असे वाटते आहे न? मग *मला* १५% कमिशन द्या.' अर्थात गुपचूप पणे. जो डॉक्टर तपासणीसाठी रुग्ण पाठवतो त्याला कामिशन द्या. आपली औषधे रुग्णांना द्यावी म्हणून डॉक्टरांना प्रलोभने द्या इ.

<u>शिक्षेतून सुटका</u>: लाल बत्ती असताना गाडी पुढे काढली, आणि पोलीसाने पकडले: कायदा तोडताना पकडले गेलात. कशाला भरायचे रु १५० दंडाचे? हुशारी दाखवा आणि पोलिसाला रु ५० देऊन मोकळे व्हा.

<u>कायदा तोडणे</u>: कायद्याप्रमाणे बांधकाम जागेच्या १/३ भागात करायचे असते: प्लॅन मध्ये तसे दाखवा आणि तो संमत झाल्यावर बांधकाम १/२ जागेत करा आणि 'पास' करवून घ्या.

<u>वशिलेबाजी</u>: 'आपली माणसे' लायकी नसली तरीही –आणि लायकी असल्यास योग्य प्रथा टाळून – कामावर नेमणे हा एक सरकारी क्षेत्रांत सर्रास आढळणारा प्रकार. येथे 'आपले माणूस' नातेवाईक असले पाहिजे असं नाही. मित्र, मोठ्या लोकांची 'उपयोगी पडू शकतील' अशी मुले, व भरपूर पैसे देऊ करणारा उदार दाता पण आपलाच असतो!

याशिवाय खासगी क्षेत्रांत नफेखोरी हा प्रकार पण चालतो. १०-२० टक्के नफा योग्य समजला जातो, पण कित्येक वेळा स्पर्धा नसल्यास ही टक्केवारी १०० पण होते. हा प्रकार कायद्याने गुन्हा नाही, पण सद्वृत्ताच्या कसोटीस उतरत नाही, व सदाचारात पण मोडत नाही. खोटी दलाली पण भारतातील खासगी क्षेत्रांत मोठ्या प्रमाणात आढळते.

या सर्व प्रकारचे भ्रष्ट व्यवहार भारतात किती प्रमाणात होत असतात याचे मोजमाप दर वर्षी केले जाते. बर्लिन स्थित ट्रान्सपेरन्सी इंटरनेशनल (आंतरराष्ट्रीय पारदर्शकता प्रतिष्ठान www.transparency.org ) ही संस्था जगातील १७० हून अधिक देशात दर वर्षी भ्रष्टाचाराचा फैलाव व तीव्रता मापते. ह्या मापाचे नाव आहे 'भ्रष्टाचार निर्देशांक' भ्र.नि. १ ते १०० पर्यंत असतो. १०० म्हणजे भ्रष्टाकार बिलकुल नाही. निर्देशांक ९० च्या जवळपास असणारे देश जगात १०-१५ आहेत.भारताचा क्रमांक १७० मध्ये साधारण ८५ च्या जवळपास असतो. आपला भ्र. नि. १९९५ मध्ये २६ होता तो २०१३-१४ पर्यंत ३६-३८ झाला आहे. अमेरिकेसारखा किमान ७५ किंवा कॅनडा सारखा निदान ८७ झाला तरच सामन्या मनोस त्याच्या हक्काच्या सरकारी सोयी सवलती पैसे न चारावे लागता उपभोगू

शकेल. १९९५ पासूनची जी प्रगती झाली आहे त्याची मुख्य कारणे माहिती हक्काचा कायदा, जन हित याचिका, संगणकीकरण, आणि अनेक जनसमूहांच्या संस्थांनी केलेला सरकारवरील दबाव ही आहेत. राजकारणी आणि शासक मिळून मोठ्या प्रमाणावर भ्रष्ट आचरण करीत असल्याने त्यांच्याकडून सुधारणा होण्याची शक्यता कमी असते. सरकारवरील दबाव वाढवणे, मतपत्रिकेमधून आपले मत नोंदवणे जरूर आहे. तरच प्रगतीचा वेग वाढू शकेल. (अण्णा हजारे यांचा सत्याग्रह, आम आदमी पार्टी ची स्थापना, व नरेंद्र मोदी यांची पंत प्रधान पदी निवड इत्यादी चांगली चिन्हे २०१४ च्या मध्यावर दिसत आहेत.)

कर-चोरी सर्व प्रकारच्या करांच्या बाबतीत केली जाते - वैयक्तिक उत्पन्नावरील कर, विक्री कर, जमीन-घर खरेदी वेळचे कर इ.इ. याचा अर्थ स्पष्ट आहे. चांगल्या सुस्थितीत असलेले प्रजाजन सरकारी कर चुकवून 'काळा पैसा' जमा करतात व वापरतात. यातील एक मोठा भाग परदेशातील गुप्तता बाळगणाऱ्या बँकातून ठेवला जातो. (हा अब्जावधी रुपयांचा निधी भारतात परत आणण्याचे प्रयत्न नव्या सरकारने सुरु केले आहेत.)

लाचखोरीतून जमा झालेला पैसा आपल्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या १०-१५ टक्के असतो, तर कर-चोरीचा काळा पैसा ३५-४० टक्के असतो असा अंदाज आहे. काळी अर्थव्यवस्था भारताच्या अर्थव्यवस्थेच्या तुलनेत ५०-६० % असावी असं अंदाज आहे.

*विवेकवादी नीतीतत्वांच्या भिंगातून पहिले तर सर्व प्रकारचे भ्रष्ट व्यवहार व कर-चोरी ह्या दोन्ही गोष्टी सदवृत्त, सदाचार आणि कायदा या तीनही अंगांनी वाईट/चूक म्हणून त्याज्य आहेत.*

थोडक्यात काय, तर सामान्य प्रजाजन आणि सुखवस्तू श्रीमंत हे सर्व वैयक्तिक बाबतीत नीतिमान आहेत, पण सरकारी कायदे पाळण्यात व कर भरण्यात मोठ्या प्रमाणात अनीतीमान आहेत.

आपण काय करू शकतो?

"सर्व परिस्थितीच वाईट आहे, आपण एकटे काय करणार?" असे मत बहुतेक जण बोलून दाखवितात. पण जो ह्या अनैतिक गोष्टी करणार नाही असे ठरवतो, त्याला बरेच कांही करता येते.

- स्वत:शीच ठरवा की मी कुठल्याही प्रकारची लाच घेणार नाही व कर चोरी पण करणार नाही. अनंत फंदी यांचा सुप्रसिद्ध फटका आठवा: "धोपट मार्गा सोडू नको --- कष्टाची बरी भाजी भाकरी तुपसाखरेची चोरी नको." यासाठी पैशांचा मोह टाळायचा असतो असे बिलकुल नाही. न्याय्य मार्गाने जितका मिळविता येईल तितका मिळवत राहावे ---त्यांत स्वतःचे व देशाचे कल्याण आहे. "अर्थेषणा न व्यसनेषु गण्यते" धन मिळवायची प्रबळ इच्छा हे व्यसन नव्हे! -- चाणक्य!

- नाईलाज म्हणून लाच द्यावी लागते, त्यातून सुटका नाही हे तितकेसे खरे नाही. ट्रान्सपरन्सी च्या सर्वेक्षणात काय आढळले आहे ते बघा: भारतात सर्वात जास्त बिघडलेल्या संस्था दोन आहेत, पोलीस आणि न्याय खाते (न्यायाधीश नव्हेत). या खात्यांशी संबंध आलेले लोक सांगतात की ६०-७० टक्के केसेस मध्ये या न त्या प्रकारे लाच द्या असे सुचविले जाते. मात्र प्रत्यक्षात दिली जाते ३०-४० टक्के व्यवहारात. म्हणजेच निदान ५० टक्के केसेस मध्ये लाच न देता काम होऊ शकते. सर्व नियमांचे पालन करून हक्काची गोष्ट मागा, समोरच्या 'सहाय्यकाने' असहकार केल्यास त्याच्या वरील पर्यावेक्षाकाकडे दाद माग. तो/ती जरी स्वतः पासे खाणाऱ्यांपैकी असला/ली तरी अशा तक्रारी आल्यावर त्यांना 'सरळ' असण्याचे ढोंग करावे लागते व तुमचे काम जल्दी पैसा न देता सुध्दा होते.

- धंदेवाईक व व्यावसायिक कर चोरीच्या भ्रष्ट वाटेने जातात याला कारणे दोन: पैशाची हांव व समाजांत पैसे कसे मिळवले हे न बघता मिळत असलेला मान सन्मान. एके काळी जेव्हा आय कराचे दर भरमसाठ ( ७५ टक्के आणि अधिक) होते, तेव्हा कर-चोरी करणे आपण समजू शकतो. आजमितीस कर ३३ टक्के आहे, व जगातील कमी कर असलेल्या देशात आपला भारत आहे. सेवा कर सुध्दा फार नाहीत. लाखो रुपये वर्षाला कमावणाऱ्या लोकांनी

अशी कर-चोरी करावी हे त्यांच्या चारित्र्याला डाग देणारे आणि राष्ट्राचे मोठे नुकसान करारे अ-सद्वर्तन, असदाचार, आणि बेकायदा वर्तन आहे. त्याची लाज वाटली पाहिजे, पण ती न वाटण्या इतके आपण निर्लज्ज झालो आहोत. ("'सरकारी कामात भ्रष्टाचारामुळे पैसे खाल्ले जाऊन वाया जातात. म्हणून आम्ही कर न देता योग्य संस्थांना दान देतो." असे सदाचारी तर्कशास्त्र लढवणारे पण असतात. मात्र चोरले किती व दान किती दिले ते मात्र विचारू नका म्हणजे ठीक. शिवाय अनेकदा असे दान देवस्थानांकडे वळते व गरीबांच्या कामी येत नाही.) सरकारी कल्याण योजनांना पुरेसे धन मिळत नाही याचे एक अतिशय महत्वाचे कारण म्हणजे कर-चोरी.

भ्रष्ट मार्गाने जाणाऱ्याना - लाच घेणाऱ्याना व कर चोरी करणाऱ्याना - उपदेश करून काम होणार नाही हे सर्वच समजून आहेत. त्यांना वठणीवर आणण्यासाठी न्याय प्रक्रिया सुधारली पाहिजे. न्याय कांही महिन्यात –आजकाल प्रमाणे वर्षात नाही –मिळाला पाहिजे. कायदे मोडणाऱ्याला मोठी शिक्षा एका वर्षाच्या आत व्हायला लागली तरच हे प्रकार काबूत येऊ शकतील. सामान्य माणसाला लागणारे कागदपत्र संगणकीकरण करून पण लाच कमी केलेली आहे. अनेक संस्थांचे काम स्वतंत्र करून सुधारले पाहिजे. उदा. सी बी आय. अशा प्रकारचे बदल घडवून आणण्यासाठी प्रजेचा सरकारवर सतत दबाव असला पाहिजे. असा जोर मतपेटीतून नुकताच दिसला आहे. खरे पाहता शाळा आणि महाविद्यालयातून पण या विषयी जाण वाढवली पाहिजे, म्हणजे नवी पिढी सुधारू शकेल.

परत एकदा: आपल्या वैयक्तिक जीवनात आपण छान नीतिमान आहोत व राहतो पण: मात्र सरकारशी संबंधित बाबीमध्ये आपण मोठ्या प्रमाणात अनीतीने वागतो. त्यातून बाहेर पडायला सुदृढ मन व धैर्य लागते. ते प्रयत्नांनी अगदी प्रत्येकाला मिळवता येते. असे चांगले वागून पहा; तुमचा आत्मसन्मान खचित वाढेल.

ashokgarde@hotmail.com

•••

# 'एक लढाई, जी बांगला देशने जिंकलीच पाहिजे'

*मेह्फ़ुझ़ अनाम*

राजकारण समाजकारण

या खुनाची पूर्वसूचना खूप आधीच देण्यात आली होती. खुनाआधी साधारण एक वर्ष म्हणजे, फेब्रुवारी ९, २०१४ रोजी मुख्य आरोपी शफिउर रहमान फराबी याने फेसबुक वरील आपल्या मित्रांना सांगितले होते कि अविजित रॉय अमेरिकेमध्ये राहतात. "त्यामुळे त्याला आत्ता मारणे शक्य होणार नाही. जेव्हा तो परत येईल तेव्हा त्याला मारता येईल," असे तो म्हणाला होता. फराबी सध्या अटकेत आहे. त्याने नंतर अविजित यांच्या कुटुंबाचे फोटो तसेच त्यांच्या अमेरिकेतील पत्त्याचा ठावठिकाणाही शोधला होता. त्याने अविजित यांच्या मित्रांकडेही चौकशी केली होती. फराबी याला दोन वर्षांपूर्वी अटक करण्यात आली होती व सहा महिन्यामध्ये त्याची जामिनावर सुटका झाली होती. 'मुक्त विचारांना' पाठिंबा देणाऱ्या सर्व ब्लोगरना मारण्याच्या त्याच्या प्रयत्नांना त्याने तात्काळ परत सुरवात केली होती. त्यावेळी सुटकेनंतर त्याने लिहिले कि, "माझ्या मते नास्तिक लोक म्हणजे किड्यासमान आहेत आणि किडे हे मेलेलेच बरे."

फराबी आणि अविजित यांचा मुक्त विचार आणि धार्मिक मूलतत्ववाद या विषयांवर सोशल मिडीयाच्या माध्यमातून वाद झाला होता. मात्र फराबी कडून जिवे मारण्याच्या धमक्या आल्यावर अविजित यांनी सर्व संभाषण बंद केले होते. त्यानंतर फराबीने त्यांना मोबाईलवर धमक्यांचे संदेश पाठविण्यास सुरवात केली. या सर्व पार्श्वभूमीवर अविजित यांनी आपल्या पत्नीसोबत बांगला देशला भेट देण्याचे ठरविले होते. त्यांची हि भेट केवळ कौटूबिक नव्हती

तर देशातील सर्वात मोठ्या म्हणवल्या जाणाऱ्या पुस्तक जत्रेमध्ये ते त्यांच्या तीन पुस्तकांचे प्रकाशन करणार होते. हि जत्रा १९५२ च्या 'भाषा चळवळीच्या' आठवणीनिमित्त आयोजित केली जाते व २१ फेब्रुवारी हा दिवस आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिवस म्हणून साजरा होतो. दहशतवाद्यांच्या धमकीला कमी लेखण्याची चूक त्यांनी केली आणि त्यांना आपल्या प्राणास मुकावे लागले.

हुमायून आझाद या बांगला देशातील प्रसिध्द लेखकालाही २००४ मध्ये अशाच प्रकारच्या हिंसक हल्याला तोंड द्यावे लागले होते. ते हल्ल्यात वाचले मात्र काही काळानंतर जर्मनीमध्ये त्यांचे निधन झाले. सोशल मीडियामुळे उभ्या राहिलेल्या युध्दकाळातील गुन्ह्यांसंबधित खटल्याला समर्थन देणाऱ्या विद्यार्थी उठावानंतर फेब्रुवारी १५, २०१३ रोजी राजीब हैदर या ब्लोगरचाही खून करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार हरकत-उल-जिहाद इस्लामी बांग्लादेश, जमत-उल-मुजाहिदीन बांग्लादेश, जाग्रता मुस्लीम जनता बांग्लादेश, शहदत-ए-अल-हुकीमा, हिझबूत तौहिद, इस्लामी समाज, उलेमा अंजुमन अल बैयीनात, हिझ्ब-उत तहरीर, इस्लामिक डेमोक्रेटिक पार्टी, तौहीद ट्रस्ट, तामिर उद-दिन आणि अल्ला'र दल या १२ अतिरेकी संघटनांवर बांगला देशात सध्या बंदी आहे. हे गट वेगवेगळ्या वेळी वेगवेगळ्या नावानी काम करतात. अद्याप बंदी न आलेले जवळपास छोटे – मोठे असे डझनभर गट अजूनही अधूनमधून डोके वर काढीत असतात.

अतिरेकी विचारसरणीच्या अनेकांना बांगलादेश सरकारने अटक केलेली आहे. तरीही, पोलिसांच्या अंदाजानुसार त्यांच्यापैकी २७० अजूनही बाहेर आहेत आणि बऱ्याच केसेस मध्ये ते हवे आहेत. २००८ ते अध्यापपर्यंत जवळपास ४७८ लोकांना १७७ केसेस मध्ये कोर्टात खेचण्यात आले आहे. बंदी घातलेल्या संघटनाच्या ५१ अत्युच्च नेत्यांना फाशी सुनावण्यात आली आहे, १७८ जणांना जन्मठेप तर २४५ वेगवेगळ्या कालावधीसाठी जेलमध्ये आहेत.

२००० च्या सुरुवातीस ही अतिरेकी विचारसरणी बांग्लादेशमध्ये झपाट्याने पसरली. यांचा म्होरक्या होता 'बांगला भाई,' ज्याचा स्वघोषित कायदेरक्षक गट लोकांमध्ये भीती पसरविण्यासाठी 'मृत्युदंड' सुनावीत असे आणि प्रेते झाडावर लटकवित असे. 'जमात-उल-मुजाहिदीन बांगला देश' या संघटनेचा प्रमुख या नात्याने देशाच्या उत्तर भागावर वर्चस्व गाजविण्यास पुरेशी ताकद त्याच्याकडे होती. मजेची गोष्ट म्हणजे त्यावेळच्या पंतप्रधान खालिदा झिया यांनी 'बांगला भाई' याचे अस्तित्वच नाकारले होते आणि त्याला केवळ मिडियाने उभारलेला बागूलबुवा असे संबोधीले होते. याच पंतप्रधानांच्या मंत्रीमंडळामध्ये जमात-ए-इस्लामीचे जे दोन मंत्री सहभागी करून घेण्यात आले होते, ज्या दोघांवरही युद्धकाळातील गुन्ह्यांबद्दल खटले चालू आहेत.

ऑगस्ट २००५ मध्ये या दहशतवादी कारवायांमध्ये प्रचंड वाढ झाली. जमात-उल-मुजाहिदीन बांगला देशने बांगलादेशातील ६४ पैकी ६३ जिल्ह्यांमध्ये एकामागोमाग एक असे ४५९ स्फोट घडवून आणले. जरी यात केवळ दोघांचा मृत्यू झाला असला तरी याचा प्रभाव प्रचंड होता. या स्फोटांमागील अतिशय सूक्ष्म नियोजन आणि या संघटनेचे देशभरातील जाळे यामुळे अख्खा देशच स्तंभित झाला होता. सरकारमधील जमत-उल-मुजाहिदीन बांगला देश या पक्षाचे पाठीराखे त्यांचे समर्थन करीत राहिले. या साऱ्यामुळे हा गट शक्तिशाली होत राहिला. तीन महिन्यांच्या आत या गटाने पुन्हा हल्ला चढविला आणि दोन न्यायाधीशांची हत्या केली. त्यापाठोपाठ अनेक स्फोट आणि हत्या करण्यात आल्या. अखेरीस २००७ मध्ये 'जमात-उल-मुजाहिदीन बांगला देश'चे अब्दुर रहमान आणि बांगला भाई या अत्युच्च नेत्यांसह सहा उच्च नेत्यांना फासावर लटकविण्यात आले. या संघटनेचे अनेक सदस्य अटक करण्यात आले ज्यामुळे हि बंदी घालण्यात आलेली संघटना बऱ्याच अंशी कमजोर झाली आहे.

२००८ च्या अखेरीस सत्तेत परत आलेल्या शेख हसीना यांच्या सरकारने या अतिरेक्यांच्या विरोधात अतिशय जोमाने व तत्काळ कारवाई सुरु केली आणि २००९ ते २०१३ या कालावधीमध्ये बराच मोठा पल्ला गाठण्यात त्यांना यश आले. मात्र, पुन्हा तीव्र झालेले राजकीय वैर आणि ऑक्टोबर २०१३ ते जानेवारी २०१४ मधील निवडणुका या कालावधीमध्ये झालेला हिंसाचार यामुळे या सर्व धार्मिक मुलतत्ववादी गटांना पुन्हा एकत्र येण्यास नवी संधी मिळाली. या कालावधीत, कायदेरक्षक आणि गुन्हेगारी विरोधातील व्यवस्था हि पूर्णपणे राजकीय तिढा सोडविण्यात गुंग झाली

होती. अटकेत असलेले अनेक अतिरेकी जामिनावर बाहेर पडले, तसेच अनेक अतिरेकी गट तयार झाले. यातीलच एक म्हणजे 'अन्सारुल्ला बांगला' ज्याने अविजित यांच्या खुनाची जबाबदरी घेतली आहे. या दरम्यान धार्मिक प्रवचने देण्यासोबतच आपल्या धार्मिक मतांपेक्षा दुसरी मते असणाऱ्यांच्या विरोधात खुनाची धमकी देण्यासाठीही सोशल मिडीयाचा मोठ्या प्रमाणावर वापर होऊ लागला होता.

केवळ कायदा व सुव्यवस्था राखणाऱ्या दलांवर विसंबणे हि अतिरेक्यांच्या विरोधात लढणाऱ्या सरकारच्या प्रयत्नांतील सर्वात मोठी चूक होती. सरकारी प्रयत्नांमध्ये 'कठोर' व 'मृदू' अशा दोन्ही प्रकारे काम करून घेण्याच्या प्रयत्नांचा अभाव असणे हे खरोखरीच आश्चर्यकारक आहे. जरी सरकारची राजकीय इच्छाशक्ती कमालीची प्रबळ असली तरी ते केवळ पोलिसांची कृती व कोर्टखटला यावरच विसंबून राहात आहेत. पुरेशा साक्षीदारांच्या व पुराव्यांच्या अभावी जामीन मिळवणे या अतिरेक्यांना सहज शक्य होते.

बांगलादेशच्या दहशतवादविरोधी मोहिमेतील सर्वात मोठी कमतरता म्हणजे राष्ट्रीय पातळीवर दहशतवादविरोधी सामाजिक – सांस्कृतिक व धार्मिक चळवळीचा अभाव. सात वर्षांपूर्वी पंतप्रधान हसीना यांनी अशा प्रकारची मोहीम सुरु केली होती. हा संकटाशी दोन हात करणाऱ्या समाजाच्या सर्व थरातील लोकांना एकत्र आणणारी हि कल्पना चांगली आणि समयोचित होती. मात्र विशिष्ट मार्गदर्शनाअभावी ती मागे पडली.

हिंसाचाराने भरलेल्या विरोधी पक्षांच्या आंदोलनाला तोंड देण्यात सरकार गर्क असल्याने, अतिरेकी प्रवृत्ती या संधीचा आपली पाळेमुळे घट्ट करण्यासाठी कसा उपयोग करतील हे वेगळे सांगण्याची गरज नाही. अर्थात, एक गोष्ट आम्हाला नक्कीच माहीत आहे ती म्हणजे हि एक अशी लढाई आहे जी बांगलादेशने जिंकलीच पाहिजे आणि आमचा विश्वास आहे कि ती आम्ही जिंकू.

'इंडियन एक्स्प्रेस'च्या सौजन्याने

अनुवाद - आलोक देशपांडे

alok.desh86@gmail.com

•••

# विवेकवाद हीच खरी नैतिकता!

*राम जगताप*

माध्यम विवेकवाद

अलीकडच्या काही वर्षांत वर्तमानपत्रांच्या खपाचे आकडे वाढत असले, तरी साप्ताहिकं, मासिकं, पाक्षिकं, त्रैमासिकं यांची संख्या मात्र दिवसेंदिवस रोडावत चालली आहे. महाराष्ट्रातल्या नियतकालिकांची अवस्था तर अजूनच बिकट झाली आहे. बंद पडण्याच्या मार्गावर असलेल्या पोस्ट खात्याचा सर्वाधिक फटका या नियतकालिकांना बसत आहे. केवळ वेळेवर अंक न पोहोचण्यामुळे अनेक नियतकालिकं बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. अशा दुर्धर परिस्थितीत 'आजचा सुधारक' या नागपूरहून प्रकाशित होणाऱ्या आणि 'विवेकवादी चिंतनाला वाहिलेले मराठी मासिक' असा लौकिक असलेल्या मासिकानं रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण करावं, ही खचितच कौतुकास्पद गोष्ट आहे; पण याची फारशी दखल महाराष्ट्रातल्या प्रसारमाध्यमांकडून घेतली जाण्याची शक्यता नाही. आज सर्वच क्षेत्रातला विवेक हरवत

चालला असताना, 'आजचा सुधारक'सारख्या गंभीर मासिकाची दखल घेतली जाणं, हे स्वाभाविकच म्हणायला हवं. अर्थात, त्याची फिकीर या मासिकाच्या संपादक मंडळालाही नाही. ते आपले काम इमानेइतबारे करत आहेत.

तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक दि. य. देशपांडे यांनी 'आजचा सुधारक' हे मासिक एप्रिल- १९९०मध्ये सुरू केलं. सुरुवातीला त्याचं नाव 'नवा सुधारक' असं होतं. गोपाळ गणेश आगरकर यांच्या 'सुधारक' या साप्ताहिकापासून प्रेरणा घेऊन हे मासिक सुरू करण्यात आलं. (पाच-सहा वर्षांपूर्वी र. धों. कर्वे यांच्या 'समाजस्वास्थ्य' या मासिकाचंही पुनर्प्रकाशन सांगलीहून डॉ. प्रदीप पाटील यांनी सुरू केलं आहे.) डिसेंबर-१९९० पासून त्याचं नाव 'आजचा सुधारक' असं करण्यात आलं. आगरकरांच्या 'सुधारक'चा समकालीन नवा अवतार असलेल्या या मासिकात विवेकवादी तत्त्वज्ञानाचा सर्व बाजूंनी चर्चा-ऊहापोह केला जाईल, असं देशपांडे यांनी पहिल्या संपादकीयात म्हटलं होतं, तर एप्रिल- १९९८मध्ये संपादक म्हणून निवृत्ती स्वीकारताना त्यांनी लिहिलं होतं, "मासिकाचं स्वरूप विवेकवादी आहे. केवळ विवेकवादाला वाहिलेलं दुसरं मासिक महाराष्ट्रात नाही, असं मला वाटतं. मासिकाने आपलं वैशिष्ट्य टिकवून ठेवावं. त्याचा कटाक्ष श्रद्धेचा उच्छेद, विचार आणि जीवन यात विवेकावर भर देणं, जीवनाच्या विविध क्षेत्रांत समंजसपणा, विवेकीपणा अंगी बाणेल असे प्रयत्न करणं, यावर असावा. लोक पूर्ण इहवादी होतील, अशी आशा करणं भाबडेपणाचं होईल; पण तरीही विवेकवाद जितका वाढेल, तितका वाढविण्याचा प्रयत्न करावा... मासिकाचं धोरण व्यक्तिस्वातंत्र्यवादी आणि समतावादी राहिलं आहे. सर्व मानव समान आहेत, त्यात स्त्रियांचाही समावेश आहे, तसेच त्यांचा विज्ञानावर भर असावा. वैज्ञानिक दृष्टी अंगी बाणेल, असा प्रयत्न करावा. विज्ञानाच्या विकृतीपासून सावध राहावं."

त्याच धोरणानुसार, या मासिकाची आजपर्यंतची वाटचाल राहिली आहे. गेल्या २५ वर्षांत या मासिकानं कितीतरी विषय हाताळले. नागरीकरण, शेती, शिक्षण अशा अनेक विषयांवर विशेषांक काढले. नुकतीच http://aajachasudharak.in या नावानं वेबसाइटही सुरू केली आहे. त्यावर अंकातील लेख स्वतंत्रपणे आणि संपूर्ण अंक पीडीएफ स्वरूपात वाचता येतो; पण दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की, या मासिकाची वर्गणीदारसंख्या २५ वर्षांनंतरही हजाराचा आकडा ओलांडू शकलेली नाही; पण केवळ वर्गणीदारांची संख्या वाढण्यासाठी अंकाचा दर्जा खाली आणण्याची वा त्यात रंजकता आणण्याची क्लृप्ती वापरण्याची गरज कधी संस्थापक, संपादकांना वाटली नाही आणि त्यानंतरच्या संपादकांनाही. त्यावरून या मासिकाचे आजवरचे सर्वच संपादक अल्पसंतुष्ट आहेत किंवा मिजासखोर आहेत, असं काहींना वाटू शकतं आणि ती खरीच गोष्ट आहे. गंभीरपणे काम करणाऱ्यांना, विवेकवादाला प्रमाण मानणाऱ्यांना आपल्या पाठीमागे फार लोक येणार नाहीत, असं वाटलं तर फारसं आश्चर्य नाही. आज तसं घडणं हे महदाश्चर्य ठरू शकतं. याचा अर्थ पूर्वी महाराष्ट्राची परिस्थिती फार चांगली होती असं नाही. १९व्या-२०व्या शतकातही विवेकवादाचा-उदारमतवादाचा वारसा अंगिकारण्याची जीगिषा बाळगणाऱ्यांची संख्या कमीच होती; पण तेव्हा त्याची चाड असणारा छोटा का होईना, एक वर्ग अस्तित्वात होता. आता तर तो पूर्णपणे नाहीसा झाला असावा, असं वाटण्याजोगी परिस्थिती आहे. समाजाच्या कुठल्याच समूहात, गटात, वर्गात, पंथात विवेकवाद शाबूत आहे, असं म्हणण्याची सोय राहिलेली नाही. २००४ साली 'आजचा सुधारक'चा १५वा वर्धापन दिन साजरा झाला. त्याला प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध नाटककार विजय तेंडुलकर यांना बोलावलं होतं. त्या वेळी ते म्हणाले होते, "आजचा सुधारक हे नियतकालिक वाचेपर्यंत विवेक आणि विवेकवादाशी आपला काहीही संबंध नव्हता. विवेकवादाने जगणं आज अशक्य नाही; परंतु कठीण मात्र झालं आहे."

तेंडुलकरांच्या म्हणण्याला आता दहा वर्षे झाली आहेत. परिस्थिती अजूनच बिकट झाली आहे. सर्वसामान्य जनतेकडून विवेकवादाची फारशी अपेक्षा करता येत नाही; पण महाराष्ट्रातील सुशिक्षित आणि बुद्धिवादी समाजाकडून तरी थोड्याफार विवेकवादाची अपेक्षा करायला फारशी अडचण पडू नये; पण महाराष्ट्रातील हा वर्ग आजघडीला सामाजिक नीतिमत्तेच्या दृष्टीनं इतका बेबंद आणि संकुचित झाला आहे की, ज्याचं नाव ते. सामाजिक नीतिमत्ता हा

विषय परंपरा, आदर्श आणि प्रेरणा यांच्यावर अवलंबून असतो, असं त्र्यं. शं. शेजवलकर म्हणतात. ते पुढे लिहितात की, समाजहितासाठी स्वत:चा स्वार्थ, अहंकार आणि आवडीनिवडी यांना कात्री लावणं म्हणजेच सामाजिक नीतिमत्ता होय. सुशिक्षित आणि बुद्धिवादी समाज ज्याला म्हणता येईल, तो समाज हा नेहमी मध्यमवर्गच असतो आणि हाच वर्ग समाजाचं पुढारपण करत असतो; पण महाराष्ट्रातील मध्यमवर्गाचे गेल्या २५ वर्षांतले प्राधान्यक्रम या गतीनं आणि रीतीनं बदलत गेले आहेत, त्यावरून या वर्गाला समाजहिताची किती चाड आहे, याचा आलेख सहजपणे दिसून येतो. उदारीकरणानंतर या वर्गाची ज्या झपाट्यानं वाढ झाली, ती स्तिमित करणारी आहे. ठोकरता येईल तेवढा समाज ठोकरायचा, करता येतील तेवढ्या खटपटी करायच्या आणि ओरबाडता येईल तेवढा पैसा ओरबाडायचा, एवढीच महत्त्वाकांक्षा या वर्गाला लागलेली दिसते. आपल्या पलीकडे समाज आहे, जग आहे, याची जाणीवच हा वर्ग विसरून गेला आहे.

उदारीकरणाचा सर्वाधिक उपभोक्ता हाच मध्यमवर्ग होता, आहे आणि आज केवळ त्याच्याच इच्छा-आकांक्षांना महत्त्व आलं आहे. सरकारपासून प्रसारमाध्यमांपर्यंत सर्वांना याच वर्गाला खुश करायचं आहे. असा सगळा 'तुझ्या गळा-माझ्या गळा...' छाप पद्धतीचा कारभार सुरू असताना 'आजचा सुधारक', 'साप्ताहिक साधना', 'परिवर्तनाचा वाटसरू' अशा नियतकालिकांची आेळख कितीजणांना असणार? किती लोकांना ही नियतकालिकं वाचायची असोशी असणार? पण हेही तितकंच खरं की, ही नियतकालिकं केवळ खप वाढवण्यासाठी सुरू झालेली नाहीत, नव्हती. 'आजचा सुधारक' तर देणग्याही स्वीकारत नाही आणि जाहिरातीही आणि तरीही ते गेली २५ वर्षे अव्याहत चालू आहे. ज्यांना विवेकवादाच्या मार्गानं जाण्याची इच्छा आहे, त्यांनीच या मासिकाच्या वाट्याला जावं. आजघडीला विवेकवाद हिच खरी नैतिकता आहे. ज्यांना स्वत:ला आरशात पाहायचं असेल आणि आपल्या आजूबाजूंच्या चारजणांना आरसा दाखवावासा वाटत असेल, त्यांनी 'आजचा सुधारक'सारखी जड मासिकं प्रयत्नपूर्वक वाचायला हवीत. हे मासिक वाचताना झोप येते, असा एक आरोप काही वाचनदुष्ट लोक करतात; पण आता तर सर्वांचीच झोप हराम होण्याच्या मार्गावर आहे. अशा वेळी 'आजचा सुधारक' खडबडून जागं करण्याचंही काम करू शकतो.

'दै. मी मराठी Live,'च्या सौजन्याने

jagtap.ram@gmail.com

•••

# आजचं भारतीय तारुण्य नेमकं आहे कसं?

*चिन्मय लेले*

युवा जीवनशैली

*भारत हा तरुणांचा देश आहे* हे घिसपिट वाक्य ऐकून आपण पुरते कंटाळलो आहोत. इथं घरात चॅनल बदलण्याची सत्ता नाही, त्यासाठी बंड पुकाराव लागतं आणि या देशातली व्यवस्था समाज, तरुण बदलतील अशी भाषणं केली जातात, असं आपल्याला वाटणं साहजिक आहे. मात्र 'मार्केट' या देशातल्या तारूण्याकडे असं पाहत नाही. बाजारपेठेचे अभ्यासक शोधतच असतात, या देशातल्या तारूण्याचं व्यक्तिमत्त्व त्याचा बदलता स्वभाव आणि आशा – आकांक्षा.

असाच एक अभ्यास जेनेसिस बर्सन-मार्सेलर नावाच्या संस्थेने अलीकडेच प्रसिध्द केला. 2015 मध्ये भारतीय तारूण्यात कुठले महत्त्वाचे ट्रेण्ड्स दिसतात, असं सांगणारा हा अभ्यास. भारतीय तारूण्य अनेक घटकांमध्ये विभागलं गेलेलं असलं, तरी त्यांच्यात काही ठळक महत्त्वाचे ट्रेण्ड्स स्पष्ट दिसतात असा या अभ्यासाचा दावा आहे. जागतिकीकरणाचं वारे देशात पुरेसं मुरलं असताना तरूण झालेली ही पिढी विचारच वेगळा करते आणि वेगळ्या नजरेनं आपल्या आयुष्याकडे पाहते, असं या अभ्यासाचं म्हणणं आहे.

त्यातून त्यांनी काही प्रमुख ट्रेण्ड्स अधोरेखित केले आहेत.

त्यांच म्हणणं भारतातली ही पिढी चेंज चॅम्पियन आहे. पुर्वीच्या तरूण पिढ्यांसारखी कुठलीच ओझी या मुलांच्या खांद्यावर नाहीत, त्यामुळे मनात येईल तसं जगण्याची आणि जगण्यातली मौद शोधण्याची धमक या नवीन पिढीत आहे.

त्या धमक असलेल्या तारुण्याचे त्यांनी अधोरेखित केलेले काही खास गुण वाचून मनाशी ताळा करायला हरकत नाही की, आपल्यातही ते प्रातिनिधिक गुण आहेत की नाहीत?

**1. स्टेटमेण्टल**

हा शब्दच मस्त आहे. हा अभ्यास म्हणतो, या तारुण्याचं सूत्र एकच आपलं मत ठामपणे मांडायचं. उत्तम दिसायचं आणि उत्तम कामगिरी करत चार पाऊलं सगळ्यांपेक्षा पुढं रहायचं. त्यांचं दिसणं, त्यांची कामगिरी, त्यांची मतं हे सारं एक प्रकारचं स्टेटमेण्टच आहे. मध्यमवर्गीय घरातलीही त्यांना जे जे म्हणून लेटेस्ट आणि बेस्टेस्ट आहे ते ट्राय करून पहायचंय. त्यासाठी ते आतूर आहेत. त्यांच्याकडे पर्यायही आता भरपूर आहे. त्यामुळे ते ज्या ज्या वस्तू वापरतात, जे जे अनुभव घेतात, जे जे स्वीकारतात ते सारं आपल्या जगण्याचा दर्जा उंचावला म्हणून!

**2. न्यूअर. बेटर**

ही पिढी फक्त गॅजेट्स अपडेट करत नाही, तर ही पिढी स्वतःलाही अपडेट करण्यासाठी, स्वतःच बेटर व्हर्शन घडवण्यासाठी धडपडते आहे. त्यांना तब्येत धडधाकट करायची आहे, स्वतःच नॉलेज वाढवायचं आहे. स्वतःकडे असलेले स्किल सुधारून नवीन स्किल्स शिकायचे आहेत. जे जे ब्रँड ते वापरतात त्यांचा वापर आणि त्यंचा एक्सपिरियन्स आणिक बेटर असावा म्हणून ते सतत प्रयत्न करत आहेत. आपण आज जे आहोत त्यापेक्षा 'बेटर' काहीतरी हवं हे त्यांच सूत्र.

**3. देसी कूल**

जागतिकीकरण आलं नवीन वारं शिरलं. सगळया नव्या गोष्टी आल्या; पण म्हणून 'देसी' गोष्टींच महत्त्व कमी झालेलं नाही. उलट 'देसी' गोष्टी, वस्तू वापरणं हे या मुलांना 'कूल' वाटतं. आपल्या देशी गोष्टींचा त्यांना अभिमान आहे. देशी वस्तू, सेवा, ज्ञान या साऱ्यांकडे ते आदरानं पाहतात, नाकारण्याआधी प्रत्येक गोष्ट तपासून पाहतात.

**4. चिल् अँड रिलॅक्स**

या देशातल्या आजवरच्या तरुण पिढ्या फक्त बरं आयुष्य घडवण्यासाठी धावल्या. भर तारुण्यात जगणं विसरल्या. ही पिढी थोडी वेगळी आहे. त्यांना भरपूर जगून घ्यायचं आहे. त्यासाठी मनोरंजन, बाहेर खाणंपिणं, दोस्तांबरोबर मजा, भटकंती हे सारं ते करतात. त्यांना नकोय आपलं बोर आयुष्य. जगणं सेलिब्रेट करत 'एन्जॉयेबल' करण्याची धडपड सुरूच आहे.

**5. राइट हिअर, राइट नाऊ**

भारतातल्या आजच्या तरुण पिढीला सगळं आज हवं आहे. आज म्हणजेही आत्ता! त्यांना आत्ता सुंदर दिसायचयं, त्यासाठी आत्ता लगेच कौतुक पण करून हवयं त्यांना जे मिळवायचं आहे ते लगेच, तातडीनं मिळवायचं आहे. त्यांना धीर नाहीये, अनुभव घेऊन काही करू, अस नकोय, जे हवंय ते आज, आत्ता, या क्षणी!

**6. चेंज चॅम्पियन**

ही तरुण पिढी अत्यंत बिझी आहे. कुणाकडे वेळच नाही; मात्र तरीही जे जसं आहे तसं ते स्वीकारायला तयार नाहीत. देशातल्या सत्ताकारणांपासून स्वतःच्या आयुष्यापर्यंत अनेक जुनी समीकरणं त्यांनी मोडीत काढायला सुरुवात केली आहे. त्यांच्या प्रश्नांवर उत्तरं शोधण्यासाठी ते नवीन ज्ञान, माहिती, कौशल्य शिकत आहेत, झगडत आहेत.

**7. कनेक्टिफाय**

मुळात भारतीय हे समाजप्रिय माणसं. त्यात आता त्यांच्या हाती कनेक्टिव्हिटी आली. सोशल नेटवर्किंग, मोबाइल फोन्स हे जीव की प्राण. या मुलांच्या आयुष्यात कनेक्टिव्हिटीनं एक नवीन जगच आणून ठेवलं आहे.

**8. टेकसॅव्ही**

जे कनेक्टिव्हिटीचं तेच टेकसॅव्ही असण्याचं. ही पिढी अत्यंत टेकसॅव्ही आहे. ऑनलाइन गोष्टी त्यांना सोप्या वाटतात. आत्ता-लगेच ऍटीट्यूडला हे तंत्रज्ञान मदत करतं. मुख्य म्हणजे या पिढीला असे वाटते की, ही टेक्नॉलॉजी आपल्याला एक सुपरपॉवर देते. एक अशी शक्ती ज्यातून त्यांना अमर्याद पर्याय मिळतात आणि व्यवहारात आजवर न दिसलेली पारदर्शकताही जाणवते.

**9. इन्फो बर्स्ट**

माहितीचा स्फोट हा शब्द आपण नेहमी ऐकतो. त्यामुळे तरुण पिढी गोंधळलेली आहे असा आरोपही केला जातो. मात्र हा अभ्यास म्हणतो की, माहितीच्या समुद्रातून योग्य माहिती काढून तिचा उत्तम वापर करण्याची हातोटी ही पिढी शिकत आहे. योग्य वेळी, योग्य माहिती, योग्य समज आणि योग्य कृती हे या पिढीचं सूत्र दिसतं.

**10. पर्सनल**

मात्र हे असं पसरट होत असताना या मुलांच्या व्यक्तिगत आवडीनिवडी, जगणं, हे सारं ते अत्यंत पर्सनल बनवत चालले आहेत. आणि त्या पर्सनल होण्यात एक सातत्य आहे आणि सोपेपणाही. या मुलांच्या आयुष्यात व्यक्तिकेंद्रिततेची प्रक्रिया अत्यंत वेगानं घडते आहे.

लोकमतच्या सौजन्याने

•••

# इहवादः मानवी प्रतिष्ठेचा महाप्रकल्प

*यशवंत मनोहर*

इहवाद विवेकवाद

पृथ्वीच्या पाठीवरील प्रत्येक माणसाचं जन्मापासून मृत्यूपर्यंतचं जीवन म्हणजे इहजीवन. एकेका माणसाचं जीवन इथं संपतं, पण अशा संपण्यानं मानवी जीवनाचा प्रवाह संपत नाही. जीवनाची शृंखला कोणत्याच कडीला शेवटची कडी मानत नाही. सतत नवनव्या कड्या उगवत राहतात. त्यामुळं ऐहिक मानवी जीवन कधी विझून जात नाही. जीवनाची वाहिनी कधी आटूनही जात नाही.

माणसाचं इहजीवन हाच इहवादाचा एकमेव विषय आहे. इहजीवनाची उज्ज्वलता हाच त्याचा ध्यास आहे. माणूस हाच जीवनाचा नायक आहे. भोवतीचं मानवी जीवन त्यानंच निर्माण केलं आणि ही अधिकाधिक उज्ज्वल मानवी जीवन निर्माण करण्याची प्रक्रियाही खंडित होणं त्यानं मान्य केलं नाही. त्यामुळं सतत पुढंपुढं जाणाऱ्या आणि गतीनं बोट न सोडणाऱ्या या जीवनाचा महानायकही तोच आहे. सर्वच माणसांच्या जीवनाचा सर्वार्थांनी कर्ता करविता माणूसच आहे. इहवाद हा निरपवादपणानं माणसाला संपूर्ण मानवी प्रतिष्ठा देऊ इच्छिणारा महाप्रकल्प आहे. या संपूर्ण प्रतिष्ठेच्या मार्गात येणाऱ्यांविरुद्धची ती लढाई आहे. माणसाच्या पूर्ण प्रकाशनाला कोणतंही ग्रहण लागू नये हा निर्धार या महाप्रकल्पाचा आहे.

इहवाद हा वैश्विक प्रकल्पच आहे. जगातला प्रत्येक माणूसच त्याचा विषय आहे. जगातल्या प्रत्येक माणसाच्या मेंदूवर किंवा प्रत्येक माणसाच्या आयुष्यावर इहवादाची इच्छा कोरलेली आहे. इहवादाचं भाषांतर सेक्युलॅरिझम असं केलं जातं. पण सेक्युलॅरिझमला सर्वधर्मसमभाव वा धर्मनिरपेक्षतावाद म्हणणं इहवादाला मान्य नाही. कोणत्याही एका धर्माचा मुद्दाच नाही. इहवादाला धर्मसंस्थाच मान्य नाही. त्यामुळं इहवादाला वा सेक्युलॅरिझमला सर्वधर्मसमभाव म्हणणं म्हणजे इहवादाच्या गळ्यात आपल्या मर्यादांचा आणि आपल्या सोयीचा पुष्पहार घालण्यासारखंच ठरतं. धर्मांमध्ये खूप भेद असले आणि त्या भेदांचा परिणाम म्हणून अनंत प्रकारच्या मारामाऱ्या असल्या आणि त्यामुळं प्रत्येकच धर्म दुसऱ्या धर्माला शत्रू मानत असला तरी या सर्वच धर्मांमध्ये एक साम्य मात्र असतंच. माणसाच्या जगण्याचा संकोच करण्याच्या बाबतीत त्यांच्यात समभाव असतो. माणसाच्या अमर्याद माणूसपणाचे छोटे-छोटे तुकडे करण्याच्या संदर्भात, माणसांना छोट्या-छोट्या चौकटींमध्ये डांबण्यात आणि त्या चौकटींचा अहंकार पढवण्यात या धर्मांमध्ये समभाव असतो. माणसाचं माणूसपण पुसून त्याला धर्माची काटेरी अस्मिता देण्याच्या संदर्भात मात्र धर्मांमध्ये समभाव असतो. हा धर्मांमधला समभाव माणसांमध्ये जवळजवळ अभेद्य असा विषमभाव निर्माण करतो आणि इमानेइतबारे त्याचं पोषण करतो.

अनेक अज्ञानपीठांनी बऱ्याच लोकांची मनं गोठवूनच ठेवलेली आहेत. त्यामुळं ज्या चुका उकिरड्यावर शोभल्या असत्या त्या चुकांची आरास अशा लोकांनी आपल्या डोक्यांमध्ये मांडलेली आहे. अनेक अज्ञानपरंपरांनी बऱ्याच लोकांना आपल्या खुंटांना बांधूनच ठेवलेलं आहे. या सर्वच अज्ञानपरंपरा आणि ही सर्व अज्ञानपीठं दुनियेच्या

परिवर्तप्रक्रियेच्या मार्गात कायम खलनायकाच्या भूमिका करीत आहेत. या खलनायकांनी नद्यांना धरणांमध्ये अडवावं, त्याप्रमाणं लोकांची मनं धर्म आणि धार्मिक अंधश्रद्धांच्या धरणात बंदिस्त केली आहेत. हे लोक मग परिवर्तनाला गुंगारा देत राहतात. परिवर्तनाला फसवल्याच्या उन्मादात जगण्याची सवय त्यांना लागते. सवयींमुळं चुकाही चिरंतन ठरतात. आधी बौद्धिक अंधता निर्माण करायची आणि असत्याला सत्य म्हणून लोकप्रियता प्राप्त करून द्यायची हेच वर्चस्वमनस्कांचं वा सत्तांधांचं पद्धतीशास्त्र असतं. देवाशिवाय, धर्मांशिवाय, प्रार्थनांशिवाय, स्वर्गाशिवाय, दैववादाशिवाय वा परलोकाशिवाय माणूस जगू शकत नाही काय? या सर्व अंधश्रद्धांच्या यात्रेशिवाय माणूस जीवन व्यतीत करू शकत नाही काय? या सर्व गोष्टी खरं म्हणजे अनंत शक्यतांची सदाफुली असणाऱ्या माणसाचा आणि त्याच्या सदाफुलीपणाचाच संकोच करतात. ही सर्व सामग्री माणसाचं खुरट्या वनस्पतीत रूपांतर करण्याची वा त्याचं बोन्साय करण्याचीच सामग्री आहे.

इहवाद माणसाच्या शक्तीचा, त्याच्या असीम शक्यतांचा वा त्याच्यातील उदंड अशा नैसर्गिक सृजनप्रेरणांचा संकोच मान्य आणि या वाऱ्याला थांबवणारी भिंत इहवादाला अजिबात मान्य नाही. माणूस हा गतीनं मोहोरणारं झाड आहे आणि या मोहोराची अडवणूक करणाऱ्या देव, धर्म, परंपरा, साहित्य, संस्कृती, परलोक, दैववाद अशा सर्वच गोष्टी माणूसद्रोही आहेत आणि संपूर्ण, स्वयंप्रभ, स्वयंशासित आणि स्वयंसर्जक असू इच्छिणाऱ्या माणसानं त्याला त्याचं अनन्य असं माणूसपण हे सुंदर वैशिष्ट्य नाकारणाऱ्या वरीलपैकी कोणतीही गोष्ट जवळपासही फिरकू देऊ नये. या गोष्टी खरं म्हणजे काल्पनिक आहेत, पण माणसाच्या माणूस असण्याचं वास्तवच त्या उद्ध्वस्त करतात. त्याचं उद्ध्वस्तीकरण टाळण्यासाठी माणसानं वरील सर्वच विघातक कल्पनांचं समूळ उद्ध्वस्तीकरण केलं पाहिजे असं इहवादाला वाटतं.

स्वर्ग, परलोक, पूर्वजन्म-पुनर्जन्म, देव, दैववाद या सर्वच गोष्टी काल्पनिक आहेत, पण या काल्पनिक गोष्टी सरंजामशाहीच्या, भांडवलशाहीच्या वा अशा कोणत्याही नावानं वावरणाऱ्या शोषणशाहीच्या पूर्ण हिताच्या असतात. या गोष्टींच्या आधारानंच सर्व शोषणशाह्या गरिबांना गुलाम करीत असतात. आणि वरील सर्वच गोष्टींच्या मदतीनं ते शोषणाचे परमनंट परवाने मिळवीत असतात. इहवाद या सर्व शोषणशाह्या उद्ध्वस्त करू इच्छितो याचं कारण या शोषणशाह्या गरिबांचं शोषण करतात. या शोषणशाह्या गरिबांच्या लक्षात येणार नाही या पद्धतीनं हे शोषण करतात आणि स्वर्ग, परलोक, पूर्व-पुनर्जन्म, देवदैववाद ही या पद्धतीची कलमे-उपकलमे असतात. या शोषणशाह्या म्हणजे त्यांच्या नाड्या ज्यांच्या हातात असतात, ती वर्चस्वमनस्क माणसंच हे शोषण करतात, पण नाव मात्र देव-दैववादाचं पुढं करतात. ते फक्त देव-दैववादाचा त्यांच्या फायद्यासाठी आणि भाबड्या गरिब मंडळींना बिनदिक्कत लुटण्यासाठी धडधडीत उपयोग करून घेत आहेत हे देवाला वा दैवाला कळतच नाही. याचं कारण देव वा दैव कुठं अस्तित्वातच नाही हे आहे. देव-दैव, परलोक या सर्वच गोष्टी आपल्याला लुटण्याची साधनं आहेत हे सर्वच या सज्जन गरिबांना कळावं असं इहवादाला वाटतं.

इहवाद या सज्जन गरिबांना कोणी लुटू नये यासाठी वरील सर्वच शोषणशाह्यांविरुद्ध लढाई करतो आणि या शोषणशाह्या धर्म, देव, दैव या ज्या काल्पनिक साधनांचा उपयोग करतो, त्या सर्व साधनांच्या निर्मूलनाचा निर्धार करतो. वरील सर्वच साधनांचं निर्मूलन करण्याचं ध्येय हे केवळ बौद्धिक खाज खाजविण्यासाठी नाही. हे ध्येय वास्तवांतरासाठी, स्थित्यंतरासाठी वा नव्या शोषणमुक्त समाजाच्या निर्मितीसाठी आहे.

देव-धर्म यांच्याशिवाय माणूस केवळच जगू शकतो असं नाही तर तो अधिकच अर्थपूर्ण पद्धतीनं जगू शकतो. देवविषयक वा परलोकविषयक कल्पनांनी माणसाला कुंडीत बसवलं आहे. त्याच्या संपूर्ण माणूसपणाच्या वाटा त्याच्यासाठी बंद केल्या आहेत. या कल्पनांनी मोहल्ल्या-मोहल्ल्यात भांडणाचे कारखाने काढले ते वेगळेच. या सर्व कल्पनांनी माणसाला जगणंही कठीण केलं आणि स्वतःला निर्माण करण्याचं जे सुख असतं, मानवी प्रतिष्ठेच्या सामग्र्याशी बोलण्यात, त्या सामग्र्याचा सूर्य व्यक्तिमत्त्वात स्थापन करण्यात जे अनिर्वचनीय सुख असतं, त्या

सुखाशीही माणसाची गाठ पडू दिली नाही. या सर्व कल्पनांनी साकल्याच्या सागराला पोचण्याआधीच माणसाची नदी मध्येच आटवली.

या कल्पनांनी माणसाला परावलंबी केलं. दुबळं केलं. आणि असं परावलंबन हेच मानवी जीवनाचं सत्य आहे, या खोट्या समजुतीच्या तुरुंगात त्याला कायम कोंडलं. या परावलंबनानं त्याला पुनःपुन्हा उगवण्यासाठी क्षितिजंच ठेवली नाहीत. या क्षितिजविहीनतेनं माणसाला झाडाप्रमाणं सतत तोडलं. या सर्वच कल्पनांनी माणसाला पोपट केलं आणि पिंजऱ्यात डांबलं. या कल्पना सांगतील वा शिकवितील तेव्हढंच माणसानं बोलावं. माणसानं स्वतःचा विचार करू नये. स्वतःच्या अस्तित्व तत्त्वाच्या रचनेचा, पुनर्रचनेचा विचार माणसानं करू नये. स्वतःच्या निखळ मनुष्यमयतेच्या मांडणीचा, फेरमांडणीचा विचार माणसानं करू नये. माणसानं त्याला मारणाऱ्या आणि शोषकांना जगवणाऱ्या कल्पनांना जगवण्याचा विचार तेवढा करावा. माणसानं आणि सज्जन गरिबानं स्वतःच्या उभारणीचा विचार करू नये. त्यानं शोषण जगवावं. अविचार जगवावेत. त्याला लोळवणाऱ्या, त्याला तुडवणाऱ्या वा त्याला मोडीत काढणाऱ्या सर्व गोष्टी त्यानं जगवाव्यात यासाठी वर्चस्वमनस्कांनी अध्यात्माचा, परलोकाचा चकवा निर्माण केला. या गोष्टी त्याला माणूस म्हणून जीवनातून उठवणाऱ्या किंवा जीवनाच्या परिघाबाहेर ढकलणाऱ्या अशा गोष्टी आहेत. परलोकाच्या कल्पनेनं इहलोकाच्या अस्तित्वाला याप्रकारे आग लावण्याचा प्रयत्न केला. हा प्रयत्न धुमाकूळ घालत राहिला, काही प्रमाणात त्याला यशही मिळत राहिलं, पण त्याला संपूर्ण वा निरपवाद यश कधीच मिळालं नाही. त्याला कारण आहे, जगभरचं इहवादी चिंतन. माणसाचं ऐहिक जीवन, त्याचं इहवादी माणूसपण, त्याची इहवादी ध्येयं, त्याची इहवादी नीती, त्याचं इहवादी साहित्य, त्याचा इहवादी समाज आणि या समाजाचं इहवादी साहित्य या एवढ्याच गोष्टी खऱ्या आहेत. माणसांमधील संबंधाची इहवादी रचना, या संबंधांचं इहवादी व्यवस्थापन तेवढं खरं आहे, अशी इहवादाची भूमिका आहे. सामान्य आणि सज्जन माणसांना वर्चस्वमनस्कांनी भ्रमांच्या महापुरात ढकललं आहे. त्यातून ही माणसं बाहेर येणार नाहीत अशा यंत्रणा हे वर्चस्वमनस्क राबवित असतात. अशा स्थितीत इहवादानं इतिहासभर इहजीवनाच्या विजयाचा, सर्वच माणसांच्या साकल्याचा आणि सर्वच माणसांच्या समान प्रतिष्ठेचा महाप्रकल्प राबवला आहे. त्या प्रकल्पाचं नाव इहवाद आहे. इहवाद ऊर्फ सेक्युलॅरिझम असं या स्वप्नाचं नाव आहे

इहवाद किंवा सेक्युलॅरिझम या महाप्रकल्पाची रचना पूर्णतः विज्ञाननिष्ठेच्या पायावर आणि बुद्धिवादाच्या बेठकीवर झालेली आहे. देव-दैव, परलोक अशा माणसाला विकलांग आणि विकलमन करणाऱ्या गोष्टी माणसाच्या जीवनात शिरणार नाहीत याची योजना इहवाद देतो. कोणत्याही पातळीवर ईश्वर या कल्पनेची गरज उरणार नाही, असं स्वयंप्रभू मानवी मन निर्माण करणारं हे तत्त्वज्ञान आहे. स्वर्गाच्या आणि परलोकाच्या फंदात पडणार नाही असं अभेद्य बुद्धिवादी मानवी मन निर्माण करणारं हे तत्त्वज्ञान आहे.

चुकीचे प्रश्न माणसाला सुचू नयेत. अप्रस्तुताच्या अरण्यात माणसांनी शिरू आणि भरकटू नये. चुकीच्या प्रश्नांचे आजार माणसांनी जीवनावर लादू नयेत. इहजीवनातले प्रश्न आपल्यामुळेच निर्माण होतात. ते प्रश्न परलोकाच्या नादानं सुटणार नाहीत. ईश्वराच्या शोधानं सुटणार नाहीत. या सर्व कल्पना आहेत आणि त्या माणसाच्याच दुबळेपणानं, आळशी वृत्तीनं आणि त्याच्या आयतेपणाच्या लालसेनं निर्माण केलेल्या आहेत. या कल्पनांनी मग माणसालाच दुबळं, विकृत आणि आळशी केलं. आपल्यावरची जबाबदारी एखाद्या कल्पनेवरती ढकलण्याची तरतूद माणसानं केली, पण या तरतुदीनं त्याच्या साहसाभोवती कुंपणं निर्माण केली. माणसांमध्ये स्वतःला अपूर्णांक करण्याची स्पर्धा लागली. एवढे अनर्थ स्वतःचा विचार स्वतःच करण्याची जबाबदारी टाळल्याच्या चुकीमुळे झाले. माणूस स्वतः लुळा झाला आणि त्यानं ईश्वर समर्थ केला. त्यानं दैवाला शक्ती दिली आणि स्वतः शक्तिहीन झाला. आणि या संदर्भांनी निर्माण केलेल्या भांडणांनी माणूस स्वतःलाच पारखा झाला. मग एक सुंदर स्वतंत्रता एक अंकितता झाली. एका प्रवाहाचं आटलेपणात रूपांतर झालं. एक अशरणता शरणागत झाली. एका साहसाचा भुसा झाला. एक बौद्धिक गर्जना मुकी झाली. माणूस नावाचं एक साहस पांगळं झालं.

अप्रस्तुताच्या नादी लागून माणसानं आपल्या शक्तीचा आणि वेळेचा अपार अपव्यय केला. त्यामुळं त्याचं खुद्द स्वतःकडंच दुर्लक्ष झालं. तोच त्याचा विषय असायला हवा होता. त्याचे इहजीवनातले प्रश्नच त्याला खरे प्रश्न वाटायला हवे होते. पण ते प्रश्न त्यानं बाजूला सारले. देव, ईश्वर असं कोणीतरी ते प्रश्न सोडवील या भ्रमात तो राहिला. त्याचे हे प्रश्न सोडवायला कोणी आलं नाही. कोणी येऊच शकत नव्हतं. कारण असं कोणी कुठं अस्तित्वातच नव्हतं आणि प्रश्नांची गर्दी वाढत गेली. एकेक माणूस अनेक प्रश्नांची विधानसभा झाला. त्यामुळं जीवनात माणसांपेक्षा प्रश्नांची संख्या अधिक झाली. कधीतरी ही प्रश्नांची भयावह गर्दी पाहून माणूस भांबावला. खूपदा जीवन म्हणजे भांबावलेल्या माणसांची गर्दी वाटते. कधी त्याच्या चुकीनं निर्माण केलेल्या चुकीच्या प्रश्नांची गर्दी वाटते. या गर्दीत आता माणूस पार दयनीय झालेला आहे. ही इहलोकाकडं पाठ फिरवण्याची शिक्षा आहे.

असं दिसतं, की माणूस जेव्हापासून आपल्या चुकांवर प्रेम करायला लागला तेव्हापासूनच तो स्वतःची हेळसांड करू लागला. तो त्याच्याच विरुद्ध वागायला लागला. तो त्याच्याच विरुद्ध बोलायला लागला आणि स्वतःलाच नाकारायला लागला. माणूस तेव्हापासून मग स्वतःला नाकारण्याची शिक्षा भोगतो आहे. या माणसाला कधीतरी स्वतःतील सूर्य विझविण्याची सवय लागली. या सवयीनंच मग त्याला स्वतःत अंधार निर्माण करण्याची विद्याही शिकविली. मग तो सहजच सूर्यद्रोह करीत राहिला. तो मग सहज स्वतःशीच द्रोह करीत राहिला. जीवनात, निसर्गात आणि खुद्द त्याच्याही मनात त्याच्याविरुद्ध जाणाऱ्या काही नकारशील गोष्टी होत्या. पण त्याच्या विचारानं जेव्हा त्याला बाजूला सारलं त्या क्षणापासून माणूस स्वतःच्याच विरोधात गेला. त्याच्याविरुद्ध तोच अशी लढाई त्यानंच निर्माण केलेल्या कल्पनांनी त्याच्या जीवनात सुरू केली. पुढं तो शरणागत म्हणून, अंकित म्हणून वा अपूर्णांक म्हणून यशस्वी झाला असेल कदाचित, पण माणूस म्हणून मात्र तो पराभूतच झाला. त्यानंच निर्माण केलेल्या काल्पनिक कथांनी त्याच्या वास्तवाचं महाकाव्य लुळपांगळं केलं.

इहवाद हे असं तत्त्वज्ञान आहे. ज्याला माणसाच्या वास्तवाचं महाकाव्य लुळपांगळं होणं अजिबात मान्य नाही. माणूस पराभूत कल्पनांचा बळी ठरू नये असं इहवादाला वाटतं.

इहवादाचा विषय माणूस आहे. त्याचा एकमेव विषय माणूसच आहे. म्हणून इहलोकाच्या विरुद्ध माणसानंच कल्पिलेला परलोक इहवादाला माणसाचा विरोधक वाटतो. इहलोकाची माणसाला उपकारक अशी निर्मिती करण्याच्या प्रक्रियेमध्ये परलोक खलनायकाचं काम करतो. म्हणून इहवाद माणसाला या परलोकाच्या विघातक मोहापासून मुक्त करण्याचं आंदोलन होतो.

इहवाद किंवा सेक्युलॅरिझम हे बुद्धिवादाचंच दुसरं नाव आहे. इहवाद माणसाला विज्ञाननिष्ठेचे पंख देतो. आणि उजेडाच्या गगनात भराऱ्या घ्यायला लावतो. माणसांमधील समतोल संबंधांची लागवड करायला लावतो. जडवादाची भावभूमी ही इहवादाची कर्मभूमी आहे. माणसाला स्वयंप्रकाशित, स्वयंशासित आणि स्वावलंबी करणं हा इहवादाचा वैश्विक जाहीरनामा आहे. इहवादाचं कळकळीचं सांगणं माणसाला असं आहे, की हे माणसा तू अत्तप्रभ हो. अत्तसूर्य हो. तू मुक्तमनस्क हो. तू कोणाचीही अधीनता पत्करू नकोस. असं झालं तर तुला माणूस या मर्यादेत राहण्याची गरज पडणार नाही. आणि तूच स्वतःभोवती तयार केलेल्या मर्यादा तुला अमर्याद होऊ देणार नाहीत. तुझ्याच अर्थपूर्णतेची विहीर तुला कायम उपसत राह्यला हवी आहे, तेव्हा निरर्थकाचे उकिरडे पुनःपुन्हा कशाला चाळून पाहण्यात स्वतःला बरबाद करतो आहेस किंवा कुठलंही सत्त्व असण्याची अजिबात शक्यता नसलेली फोलं पुनःपुन्हा आणि हजारो वर्षे कशाला पाखडतो आहेस? या सर्व पोकळ उद्योगात पडून स्वतःला कशाला पोकळ करून घेतो आहेस? माणूस एकदा स्वयंप्रभ झाला, की त्याच्या या प्रभेचा गुणाकार होतो किंवा बेरीज तर होतेच होते. म्हणून तू स्वयंनिर्भर हो. तू स्वयंनिर्भर झाला, की तुझ्या प्रभेला सगळं अंतराळ कवेत घेणाऱ्या फांद्या येतील. अजून अंधारानं लपवून ठेवलेले अवकाशाचे अनेक कानेकोपरे तुझ्या या उजेडाच्या फांद्यांच्या प्रतीक्षेत आहेत. देव, परलोक, दैव अशी अनेक आभासगृहं तू स्वतःला लपवण्यासाठी निर्माण केलीस, पण या आभासगृहांनी तुझ्या जीवनात तुरुंगांचीच भूमिका केली. या सर्वांनी तुझा शक्तिसंकोचच केला.

इहवाद माणसाला हे कळकळीनं सांगतो आहे आणि त्याच्या पूर्णप्रभतेची हमीही त्याला देतो आहे. आणि इहवादाची नीती ही माणसाच्या पूर्णांकाची नीती आहे. तीच त्याच्या पूर्णप्रभतेची आणि संपूर्ण मानवी प्रतिष्ठेची अजिंक्य नीती आहे. तिला स्वतःची ताकद आहे. ती सौहार्दपूर्ण मानवी संबंधांच्या सतत रचनेची आणि पुनर्रचनेची नीती आहे. धर्मांच्या मूलतत्त्ववादी नीतीला म्हणजे धर्माला बलदंड करणाऱ्या आणि माणसाला दुर्बल करणाऱ्या नीतीला इहवादात कुठंही थारा नाही. इहवाद ही स्वतःच श्रेष्ठ मानवी नीती आहे. बुद्धिवादाची नीती कोणती वा विज्ञाननिष्ठेची नीती कोणती, असे अज्ञानाची जाहिरात करणारे प्रश्न मूलतत्त्ववादी विचारतात. त्यांना हे सांगितलं पाहिजे, की विज्ञाननिष्ठा हीच खुद्द अत्यंत सर्जनशील आणि नवनव्या उजेडाची सतत नवनवी पालवी येणारी नीती आहे. गवसलं ते अंतिम नाही. त्याची सतत तपासणी करा. त्यातील उणिवा लक्षात घ्या. आणि समर्थ होऊन पुढे समर्थ पावलं टाकत राहा. या प्रक्रियेशी एकनिष्ठ राहा. ही जीवनाच्या नवनिर्मितीचीच नीती आहे. ही जीवनाला स्वयंप्रकाशित करणारीच नीती आहे. माणसांच्या जीवनातील अंधाराच्या जागा उजळत जाणारीच ही नीती आहे आणि बुद्धिवाद ही सुद्धा स्वतःच एक उच्चकोटीची नीती आहे. बुद्धिवाद ईश्वर, धर्म वा परलोक मानीत नाही, याचा अर्थ या सर्वांशी संबंधित विषमतेची समाजरचना त्याला अमान्यच आहे असा आहे. बुद्धिवादाला ईश्वर वा धर्म मान्य नसतो याचा अर्थ त्यांच्या अनुषंगाने निर्मिलेला परलोकधार्जिणा समाज वा त्यातील माणसांमधील असमतोल संबंधही त्याला मान्य नसतात. जात, धर्म, परलोक आणि त्यांच्याशी संबंधित सर्वच अंधश्रद्धा बुद्धिवादाला मान्यच नसतात. बुद्धिवाद म्हणजे विवेक किंवा विवेकदृष्टी. या विवेकदृष्टीला कधीही चुकीची गोष्ट बरोबर वाटणार नाही. ही दृष्टी दुर्गंधीला सुगंध म्हणणार नाही. आणि तिला विघातकता कधीही विधायकता वाटणार नाही. अन्याय कधी न्याय वाटणार नाही, ही दृष्टी पारतंत्र्याला स्वातंत्र्य मानणार नाही. द्वेषाला करुणा आणि शोषणाला समाजवाद मानणार नाही.

विज्ञाननिष्ठ होणं वा बुद्धिवादी होणं म्हणजे इहवादी होणंच असतं. विज्ञाननिष्ठा हे इहवादाचंच मार्गदर्शक तत्त्व असतं. खरं म्हणजे विज्ञाननिष्ठेची प्रक्रिया ही बुद्धिवादाचीच प्रक्रिया आहे. या प्रक्रियेचा परिपाक इहवादात झालेला आहे. धर्म वा ईश्वर या गोष्टी सत्ताधारी वर्गांची बाजू घेऊन सामान्यांची मती सपाट करतात. समाजात निराशा, पुरुषवर्चस्वाची व्यवस्था, एखाद्या भांडवलशाहीच्या वा सरंजामशाहीच्या वर्चस्वाची व्यवस्था आकाशातून पावसासारखी पडत नाही. भोगवाद, बलात्कारी वृत्ती, भ्रष्टाचारी वृत्ती, शोषकवृत्ती वा अंधश्रद्धा या गोष्टी विकृत आणि हिंस्र समाजरचनेतूनच जन्माला येतात. त्या वरून पडणाऱ्या उल्का नसतात. वर्चस्वाच्या तृष्णेतून उफाळून येणारे हे आगीचे प्रवाहच समाजाला जाळत समाजभर पसरतात. तेव्हा या अनीतीचा ईश्वर, धर्म या सर्व गोष्टी असताना कसा होतो? हे सर्व अनीतीचे खेळ असतात आणि या खेळांना परलोकाचे हवाले मान्य करून नीती म्हणा एवढीच ईश्वरवाद्यांची वा अध्यात्मवाद्यांची भूमिका असते.

काल्पनिक ईश्वरासाठी, स्वर्गासाठी नीती म्हटलं, की इहलोकासाठी तिचा उपयोग नसतो. तिचं प्रयोजनच वेगळं असतं. ती भीतीपोटीही वावरते. दबावाखाली राहते. अशा नीतीचा उपयोग ऐहिक वास्तवाला होत नसतो. नीती माणसांतील सौहार्दाशीच संबंधित असायला हवी. इहवादाची नीती अशी असते. मीही आणि पुढला माणूसही सतत उगवत राहणं, सतत प्रकाशित होत राहणं हे या नीतीचं महत्त्वाचं लक्षण आहे. ही नीती माणसासाठी आहे. स्वयंप्रभ माणसांची, स्वयंप्रभ माणसांसाठी, स्वयंप्रभ माणसांच्या बौद्धिक चारित्र्यातून उगवलेली ही नीती आहे. ती इहवादी नीती आहे. असं म्हणा, की ती नास्तिकांचीही नीती आहे. सतत उज्ज्वल माणूस असणारांची ही साधी सौहार्दाची नीती आहे.

ही इहवादाची नीती ईश्वरच मानीत नाही म्हणून प्रार्थनेच्या, शरणागतीच्या, चमत्कारांच्या, चिरंतनत्वाच्या, अंतिमत्वाच्या पावित्र्याच्या वा भक्तीच्या रंजक आणि भ्रांत पसाऱ्याला या नीतीत कुठंही स्थान नाही. इहवादाला अभिप्रेत जीवनाची रचना ही निखळ मनुष्यत्वाचीच वा तर्कशुद्धतेचीच वा विवेकाचीच रचना असते. जीवनाचा गुरुत्वमध्य ईश्वर आहे. परलोक नव्हे. नियती वा दैव नव्हे. जीवनाचा गुरुत्वमध्य माणूसच आहे, निखळ माणूस.

दैववादामुळं, भ्रमामुळं, अगतिकतेमुळं त्याच्यावर थापले गेलेले शेंदराचे थर तेवढे खरवडून काढायला हवे आहेत. तो मूळ एकसंध, नितळ आणि चौकटींनी न गिळलेला माणूस इहवादाच्या नजरेत आहे.

जीवनाची बाकीची आणि चुकीची केंद्रं विचलित, उद्ध्वस्त वा हास्यास्पद करून माणसाचं महानायकत्व, त्याचं गुरुत्वमध्यत्व इहवादाला जबाबदार जीवनासाठी, सर्जनशील जीवनाच्या भल्यासाठी प्रस्थापित करायचं आहे. माणसाच्या पूर्ण प्रकाशनासाठी, त्याला स्वयंप्रभ वा स्वयंशासित करण्याच्या मुद्यावर इहवादाला कोणतीही तडजोड अजिबात मान्य नाही. अशी तडजोड मान्य नसलेल्या इहवादाच्या बुलंद पावलांनी जीवनाला इथपर्यंत आणलं. जीवनाचा आजचा पिसारा हा इहवादी प्रज्ञाप्रतिभांचाच पिसारा आहे. ही बाब सर्वांनीच काळजीपूर्वक लक्षात घ्यावयाची आहे.

सेक्युलॅरिझम हा शब्द पाश्चात्त्य असला तरी त्याच्यातील आशयाची लढावू परंपरा भारतात सिंधू संस्कृतीपासूनची आहे. मध्ययुगाच्या समाप्तीनंतर युरोपात धर्मसत्ता आणि राजसत्ता यांच्यातील संघर्षाचा परिणाम म्हणून सेक्युलॅरिझमची चळवळ जन्माला आली आणि या दोन्ही सत्तांनी आपल्या अधिकारकक्षा आखून घेतल्या. भारतात सिंधू संस्कृतीच्या काळापासून श्रमण-संस्कृती होती. ती इहवादी होती. लोकायत आणि बुद्ध यांची तत्त्वज्ञानं इहवादीच होती. यापैकी कोणीही धर्माची स्थापना केली नाही. उलट त्यांनी त्या काळच्या धर्माच्या विरोधात आणि त्यानं पुरस्कारलेल्या समाजसंस्थेच्या विरोधात बंडच पुकारलं. ही भारताची निधर्मी परंपराच होती. शिवाय या परंपरेची समतेची नीती आहे. सेक्युलॅरिझम किंवा इहवाद आपण भारतीयांनी पाश्चात्त्यांकडून घेण्याची काहीही गरज नाही. पाश्चात्त्यांच्याही आधी भारतानं इहवादी तत्त्वज्ञानाला, इहवादी जीवनशैलीला जन्म दिला. सॉक्रेटिस वगैरे तर बुद्धाच्या नंतरच्या काळात झाले. पण सॉक्रेटिसपूर्व काळातील तत्त्वज्ञांनाही श्रमणसंस्कृतीसारखे, बुद्धासारखे वा लोकायत यांच्यासारखे इहवादी तत्त्वज्ञान आणि चैतन्यवादाचा तात्त्वज्ञानिक संघर्ष पाश्चात्त्यांपूर्वी भारतातच झाला. आपण पाश्चात्त्यांच्या संसर्गानं सर्वच गोष्टींचे प्रारंभ पाश्चात्त्य जगात झाले असं मानतो. ही गोष्ट इकडील मूलतत्त्ववाद्यांना अतोनात मदत करणारीच ठरते. मग हे पाश्चात्त्य आहे म्हणून आपण त्यापासून दूर राहिलं पाहिजे हे फक्त समाजरचना बदलु नये यासाठी म्हटलं जातं.

वास्तव मात्र वेगळं आहे. ज्या मूल्यांना आधुनिक मूल्यं म्हटलं जातं आणि जी पाश्चात्त्य आहेत असं म्हटलं जातं आणि अभारतीय म्हणून ज्यांना नकार दिला जातो ती मूल्यं पाश्चात्त्यांपूर्वी हजारो वर्ष भारतात होती, श्रमणसंस्कृती, लोकायत आणि बुद्ध यांच्या तत्त्वज्ञानात होती याकडं सोयीस्कर दुर्लक्ष केलं जातं. इहवाद आणि आधुनिक मूल्यं यांच्यात तफावत नाही. किंबहुना आधुनिक मूल्यं हेच इहवादाचं तत्त्वज्ञानरूप आहे. याचा अर्थ आधुनिक मूल्यांची बैठक असलेला इहवाद भारतातील श्रमण, लोकायत आणि बुद्ध यांनी जगाला दिला असंच म्हणायला हवं. पण या भारतीय इहवादाला पुरुषवर्चस्ववाद्यांना, वंशश्रेष्ठत्ववाद्यांना, अध्यात्मवाद्यांना आणि अलौकिकाचं नाव सांगत लौकिकात साधनवंचित गोरगरिबांचं शोषण करणारांना नकार द्यायचा असतो तेव्हा ते या गोष्टी पाश्चात्त्य असल्याचा खोटा प्रचार करतात. असा प्रचार करून ते आपलं वर्चस्व सुरक्षित करण्याचा अपयशी प्रयत्न करतात. याचं कारण भारतात जन्माला आलेला इहवाद मूलतत्त्ववादी नाही; तो गतिमान आणि परिवर्तनशील आहे. या इहवादाला सर्वधर्मसमभावात कोंबता येत नाही. आणि त्याला धर्मनिरपेक्षाताही म्हणता येत नाही. लोकांनी आपापल्या व्यक्तिगत जीवनात आपापले धर्म पाळावेत; शासन मात्र कोणत्याच धर्माचं नसतं, एवढाच धर्मनिरपेक्षतेचा अर्थ आहे. हा अर्थ स्वीकारल्यामुळंही खूप मोठा गोंधळ माजतो. कारण व्यक्तिगत पातळीवर धर्म पाळणारी माणसंच शासन चालवायला जातात. कितीही म्हटलं तरी शासनाला धर्मनिरपेक्ष होणं अवघड होऊन बसतं, पण तरीही धर्मनिरपेक्षता ही पायरी आहे आणि पायरी ही ओलांडण्यासाठीच असते. निधर्मीपणाकडं जाण्यासाठी धर्मनिरपेक्षतेची पायरी ओलांडली जाण्याची गरज असतेच. असा इहवाद जगात खूप ठिकाणी आहेच; पण त्या इहवादाची, या निधर्मीपणाची सुरवात वैदिक, ख्रिश्चन आणि इस्लाम या धर्मांच्या शेंकडो-हजारो वर्ष आधी भारतात या इहवादाचा मूळ जन्मदाता भारत आहे. संपूर्ण मानवी प्रतिष्ठेच्या या महाप्रकल्पाचा जन्म भारतात झालेला आहे. इहवाद हे माणसाच्या संपूर्ण सौंदर्याचं,

माणसाच्या संपूर्ण शक्यतांच्या संपूर्ण प्रकाशनाचं सौंदर्यशास्त्र आहे. हे तत्त्वज्ञान 'माणूस' या शब्दाला जगातला सर्वात सुंदर शब्द मानतं. 'माणूस' नावाचा हा सुंदर शब्द अधिकाधिक सुंदर करण्यासाठी इतर सर्वच शब्द प्रयत्न करतात. असं करून हे शब्दही स्वतःला अर्थपूर्ण, कृतार्थ आणि सुंदर करून घेतात.

इहवाद ही जागतिक संपत्ती आहे. सूर्यासारखा तो जगातल्या सर्वांसाठी आहे. ही सर्वांसाठी मुक्त असलेली, सर्वांचीच समान मालकी असलेली मानवी सौहार्दाच्या उजेडाची वैश्विक बँक आहे. या सौहार्दाच्या उजेडाच्या महोत्सवाकडं कुणीही पाठ फिरवू नये. जगातील प्रत्येकाच्याच जीवनात मनोरमता फुलवणारं हे झाड कोणी तोडून तर नयेच; पण त्याकडं पाठही फिरवू नये. विश्वाच्या मनुष्यमयतेचाच तो अपमान ठरेल आणि मनुष्यमयतेचा असा अपमान कोणीही करू नये.

'सकाळ, सप्तरंग'च्या सौजन्याने

●●●

# विषमतेची भारतीय स्थिती

*देवेंद्र इंगळे*

खाउजा अर्थकारण

भारताच्या संदर्भात असुरक्षित आघातग्रस्त (व्हल्नरेबल) मानवसमूहांचा विचार करावयाचा झाल्यास आपल्याकडील असे सामाजिक घटक कोणते? त्यांच्या असुरक्षिततेची पाळेमुळे कशात आहेत? संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाने (यूएनडीपी) २४ जुलै २०१४ रोजी प्रसृत केलेला मानव विकास अहवाल सांगतो की, दलित, आदिवासी, स्त्रिया आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांचा असुरक्षित आघातग्रस्त मानवसमूह म्हणून विचार करावा लागतो. परंतु हे आघातग्रस्त कोण, याचे दिग्दर्शन देशांतर्गत अहवालदेखील करतच असतात.

मानव विकास अहवाल प्रसिद्ध होण्याच्या काही दिवस आधी म्हणजे ३० जून २०१४ रोजी भारताच्या केंद्रीय गृहमंत्रालयाच्या कक्षेत काम करणाऱ्या 'नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरो'ने २०१३चा सांख्यिकी अहवाल प्रसिद्ध केला. त्यातून भारतातील विविध गुन्ह्यांसंबंधी जी माहिती व आकडेवारी समोर आली त्याआधारे भारतातील असुरक्षित आघातग्रस्त मानवसमूहांची स्थिती किती चिंताजनक आहे हे स्पष्ट होते. २००१ ते २०१३ या १३ वर्षांच्या कालावधीत देशभरात दलितांवर झालेल्या अत्याचारांची एकूण संख्या किमान ४,०९,६४२ आहे. म्हणजेच दलितविरोधी अत्याचारांची वार्षिक सरासरी ३१ हजार ५१०.९२ भरते. देशभरात साधारणत: दररोज सरासरी दोन दलितांची हत्या होते. याचा अर्थ असा की, भारतात उगवणारा प्रत्येक दिवस हा दलितहत्येचा दिवस असतो. दररोज सरासरी चार दलित स्त्रियांवर बलात्कार होतो. दररोज सरासरी एका दलिताचे अपहरण होऊन त्याच्यावर जुलुम केला जातो. दररोज सरासरी ११ दलितांचा अमानुष छळ होतो. दलितांवरील अत्याचारांमध्ये अन्य स्वरूपात होणाऱ्या अत्याचारांची दररोजची सरासरी ३७ आहे. दररोज सरासरी एक गुन्हा नागरी हक्क संरक्षण कायदा, १९५५ अंतर्गत नोंदविण्यात येतो. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा, १९८९ अंतर्गत दररोज सरासरी २९ प्रकरणांची नोंद होते. एकंदर दलितविरोधी अत्याचाराच्या दररोज सरासरी ८६ घटना पोलीस दफ्तरी नोंदविल्या जातात. देशपातळीवर दलितविरोधी अत्याचारांच्या खटल्यांत न्यायालयीन प्रक्रियेनंतर दोषारोप सिद्ध होण्याचे प्रमाण २०१२च्या आकडेवारीनुसार जिथे २३.९ टक्के आहे तिथे महाराष्ट्रातील दोषारोप सिद्ध होण्याचे प्रमाण फक्त ५.४ टक्के आहे. २०१३च्या आकडेवारीनुसार देशपातळीवर दोषारोप सिद्ध होण्याचे प्रमाण शेकडा २३.८ आहे, तिथे महाराष्ट्रातील दोषारोप सिद्ध होण्याचे प्रमाण फक्त शेकडा ६.२ इतके म्हणजे अगदीच नगण्य आहे.

देशपातळीवर आदिवासींवर होणाऱ्या अत्याचारांसंदर्भात २०१३ची आकडेवारी आधारभूत मानल्यास महिन्याकाठी सरासरी १० आदिवासींची हत्या होते. दरमहा सरासरी ७० आदिवासी स्त्रियांवर बलात्कार होतो. अ.जा. व अ.ज. अत्याचार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत दर महिन्याला सरासरी ११५ गुन्ह्यांची व दिवसाकाठी तीन ते चार (३.८६) गुन्ह्यांची नोंद होते. आदिवासींवर होणाऱ्या विविध स्वरूपांच्या अत्याचारांच्या घटनांची सरासरी लक्षात घेतल्यास दरमहा ५६६ घटनांची अर्थात दररोज १८ घटनांची नोंद होते. आदिवासी जनसमूह भौगोलिकदृष्ट्या दुर्गम भागात मोठ्या प्रमाणात निवास करून असल्यामुळे, शिक्षणाचे प्रमाण निम्नतम पातळीवर असल्याने, दळणवळणाच्या सुविधांचा अभाव तसेच शाहूसमाजाची भयंकर दडपशाही व जुलुम यामुळे आदिवासींवर होणाऱ्या बहुतांश अत्याचारांची पोलीस दफ्तरी नोंद होत नाही. याबरोबरच नक्षलग्रस्त प्रदेशात दोन्ही बाजूंनी सुरू असलेल्या हिंसाचारांत प्रामुख्याने बळी जाणारे आदिवासीच असतात.

स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांची स्थिती तर खूपच चिंताजनक आहे. स्त्रियांच्या एकूणच आचार-विचार-संचारस्वातंत्र्यास नियंत्रित करून जात-सामंती पितृसत्तेने आपले हितसंबंध संरक्षित केले आहेत. जातिसमाजात स्त्रियांच्या वाट्यास आलेल्या सर्वकष दास्यामुळे त्या जात-सामंती-पितृसत्तेच्या सहज भक्ष्य बनत आल्या आहेत. स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांची भयप्रद आकडेवारी पाहता जात-सामंती-पितृसत्ताक समाजातील लिंगभावजनित हिंसक क्रौर्याचे भीषण वास्तव स्पष्ट होते. २०१३ मध्ये देशपातळीवर स्त्रियांवर झालेल्या अत्याचारांची एकंदर संख्या ३,०९,५४६ आहे. दररोज स्त्रियांवरील अत्याचाराच्या सरासरी ४४८ घटना घडतात म्हणजे तासाला ३५ आणि दर दोन मिनिटांनी एका घटनेची पोलीस दप्तरी नोंद होते. दर महिन्यात सरासरी २८०८ स्त्रिया बलात्काराची शिकार बनतात. याचा अर्थ असा की, दररोज ९४ महिलांवर बलात्कार होतो. प्रत्येक तासागणिक चार स्त्रियांवर बलात्कार होतो. नवरा किंवा नातेवाईकांकडून होणाऱ्या अमानुष छळापायी २०१३ या वर्षात ११८८६६ घटनांची पोलीस दफ्तरी नोंद झाली होती. याचा अर्थ असा की, दर महिन्याला अमानुष छळाच्या ९९०५ (दिवसाला ३३०, दर तासाला १४) घटना नोंदविण्यात येतात. हुंड्यापायी स्त्रियांची हत्या होण्याचे प्रमाण बरेच मोठे आहे. २०१३ साली ८०८३ हुंडाबळींची नोंद झाली. नोंदींचे हे प्रमाण महिन्याला सरासरी ६७४, म्हणजेच दररोज २३ हुंडाबळी किंवा दर तासाला एक हुंडाबळी, असे आहे. या बळींखेरीज, हुंडाप्रतिबंधक कायद्याअंतर्गत २०१३ साली हुंड्याकरिता छळ केला म्हणून १०७०९ गुन्ह्यांची नोंद झाली. म्हणजे महिन्याला ८९२, दररोज २९७ आणि दर तासाला १२ नोंदी छळाच्याच. जातिव्यवस्थेची कार्यपद्धती आणि मूल्यप्रणाली इतिहासकाळापासून दलित, आदिवासी, अल्पसंख्याक जनसमूह आणि स्त्रियांच्या विरोधातील हिंसाचार व अत्याचारांस संरचनात्मक आधार प्रदान करत आली आहे. जात-सामंती-पितृसत्ताक स्वरूपाच्या गावगाड्यातील विषमताप्रधान सामाजिक-उत्पादन संबंधांनी जातिव्यवस्थेस ठोस असे भौतिक अधिष्ठान प्राप्त करून दिले, तर जातिव्यवस्थेला धार्मिक-तात्त्विक अधिष्ठान देण्याचे काम ब्राह्मणी धर्म व मूल्यप्रणालीने केले. जोवर जात हेच भारताचे धगधगते सामाजिक वास्तव आहे तोवर हजारो-लाखो दलित, आदिवासी, अल्पसंख्याक जनसमूह आणि स्त्रियांचे बळी नित्यक्रमाने जात राहणार. भारतातील असुरक्षित आघातग्रस्त मानवसमूहांची समस्या सामाजिक-आर्थिक संरचनेचा भाग आहे तशीच ती धर्मपुरस्कृतदेखील आहे, ही वस्तुस्थिती लक्षात घेतल्यास भारतात तातडीने मूलभूत स्वरूपाचे सामाजिक-आर्थिक परिवर्तन तसेच समतालक्ष्यी प्रबोधनाची गरज स्पष्ट होते.

जगाच्या तुलनेत आणि भारताच्या तुलनेत भारतातील दलित आणि आदिवासींचा मानव विकास निर्देशांक जर पडताळून पाहिला तर भारतात विद्यमान भीषण स्वरूपाच्या सामाजिक-आर्थिक विषमतेवर लख्ख प्रकाश पडतो. दलित आणि आदिवासी जनसमूहांचा सामाजिक-आर्थिक तसेच आरोग्यविषयक अभ्यास करून 'यूएनडीपी'नेच २००५ मध्ये दलित आणि आदिवासींचा मानव विकास निर्देशांक निश्चित केला होता. त्यानुसार दलितांचा मानव विकास निर्देशांक ०.३२८ होता, तर आदिवासींचा मानव विकास निर्देशांक ०.२७० होता. दलित आणि आदिवासींच्या मानव विकास निर्देशांकाची आणि २०१४ च्या मानव विकास अहवालातील जागतिक क्रमवारीशी तुलना केल्यास कोणते

निष्कर्ष असे निघतात की, दलित (०.३२८) आणि आदिवासींचा (०.२७०) मानव विकास निर्देशांक हा जागतिक क्रमवारीत १८७ व्या क्रमांकावर असणाऱ्या नायजर (०.३३७) या देशापेक्षाही खालावलेला आहे. म्हणजेच भारतातील दलित हे जगातील अतिमागास व दुर्भीक्षग्रस्त देशांपेक्षाही नीचतम जीवनस्तरात राहून गुजराण करीत आहेत.

भारतातील दलित-आदिवासी-भटके विमुक्त आदी मानवसमूह हे तर, कदाचित 'जगातील सर्वाधिक निकृष्टतम जीवनस्तरात राहणारे लोक' आहेत. दलित- आदिवासी- भटकेविमुक्त- अल्पसंख्याक- स्त्रियांची सार्वत्रिक पातळीवरची कुचंबणा आणि मुस्कटदाबी लक्षात घेता त्यांचं जगणं हे किती भयंकर मरणप्राय यातनांनी आणि पिळवणुकीने व्यापलेले आहे त्याची कल्पना येते. दलित-आदिवासींच्या प्रश्नांची तीव्रता समजून घ्यायची असेल, तर आपण जागतिक लोकसंख्येशी तुलना करायला पाहिजे. २०११च्या जनगणनेनुसार दलितांची लोकसंख्या २०,१३,७८,०८६ आहे म्हणजे ती जागतिक क्रमवारीत लोकसंख्येच्या दृष्टीने पाचव्या क्रमांकावरील ब्राझीलच्या लोकसंख्येपेक्षा (१९,३३,६४,०००) अधिक आणि चौथ्या क्रमांकावरील इंडोनेशियापेक्षा किंचित (२३४,१८१,४००) कमी आहे. २०११ च्या जनगणनेनुसार आदिवासींची लोकसंख्या १०,४२,८१,०३४ असून ती जागतिक क्रमवारीत लोकसंख्येच्या दृष्टीने बाराव्या स्थानी असलेल्या फिलिपाइन्स (९,४०,१३,२००)पेक्षा अधिक आहे. २०११च्या जनगणनेनुसार दलित व आदिवासींची एकंदरीत लोकसंख्या ही भारताच्या एकंदरीत लोकसंख्येचा २५ टक्के हिस्सा आहे. दलित+आदिवासी यांची एकत्रित लोकसंख्या (३०,५६,५९,१२०) भरते, ती जागतिक क्रमवारीत तिसऱ्या स्थानी असणाऱ्या अमेरिकेपेक्षा (३०,९९,७५,०००) किंचित कमी आणि चौथ्या क्रमांकावरील इंडोनेशिया (२३,४१,८१,४००)पेक्षा अधिक भरते. याचा अर्थ असा आहे की, छाड, मध्य आफ्रिका, कांगो, नायजरपेक्षाही अत्यंत खालावलेले जीवनमान असलेले मानवसमूह (दलित, आदिवासी, भटकेविमुक्त) भारताच्या पोटात राहताहेत ज्यांचे संख्यात्मक आकारमान जवळपास अमेरिकेच्या लोकसंख्ये इतके आहे! मानव विकासाच्या आघाडीवर भारताला खरोखरच प्रगती साध्य करावयाची असेल तर भारतातील विषमता व शोषणाच्या मुळाशी असणाऱ्या कारणांचे समूळ उच्चाटन करावे लागणार. ही मूळ कारणे जोवर नष्ट होत नाहीत तोवर भारत मानव विकासाबाबत तळाशीच राहणार. भारतातील असुरक्षित आघातग्रस्तांचा मुद्दा अंतिमत: सामाजिक-आर्थिक संरचनेशी संबंधित असल्या कारणाने त्या प्रश्नाची सोडवणूक मूलगामी स्वरूपाच्या सामाजिक-आर्थिक पुनर्रचनेतूनच शक्य आहे. माध्यान्ह भोजन योजना, सर्व शिक्षा अभियान, महात्मा गांधी रोजगार हमी योजना, तसेच तत्सम स्वरूपाच्या कल्याणकारी व सेवाभावी योजनांच्या माध्यमातून जुजबी आणि वरवरची मलमपट्टी करून फार तर समस्येचे गांभीर्य नष्ट करता येईल; पण समस्या मात्र तशीच राहील. खरा मुद्दा आहे शोषणमुक्त-समताधिष्ठित लोकशाही समाजनिर्मितीचा. ते ध्येय प्राप्त करायचे असेल, तर लोकशाही हक्क स्थापित करण्यासाठीचे संघर्षात्मक जनलढे उभे करूनच भारतीय संविधानाने उपलब्ध करून दिलेला लोकशाहीचा अवकाश विस्तारता येऊ शकतो. लोकशाहीचा उपलब्ध अवकाश पुरेपूर उपयोगात आणला नाही, तर भारतात आज लोकशाहीचा जो थोडाबहुत अवकाश उपलब्ध आहे तोही आक्रसेल!

'लोकसत्ता'च्या सौजन्याने

ingledevs@gmail.com

●●●

# प्रबोधन परंपरेची पीछेहाट

*सुहास कुलकर्णी*

विवेकवाद राजकारण

गेल्या महिन्यात गोविंद पानसरे मारले गेले. दीड वर्षापूर्वी नरेंद्र दाभोलकर मारले गेले. हे दोघंही महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीचे महत्त्वाचे चेहरे होते, प्रबोधनकार होते. त्यांचे विचार न पटणाऱ्यांनी त्यांची हत्या केली आहे. पण ही अर्थातच सिद्ध न झालेली गोष्ट आहे. परंतु ही दोन्ही माणसं सार्वजनिक जीवनात असल्याने त्यांच्या हत्यांना सार्वजनिक संदर्भ असणार, याबद्दल सरकारलाही शंका नाही. त्यामुळेच 'या हत्या या व्यवस्थेला दिलं गेलेलं आव्हान आहे,' असं विधान खुद्द मुख्यमंत्र्यांनीच केलेलं आहे.

मुख्यमंत्र्यांच्या या विधानाचा राजकीय अर्थ काय, वगैरेंवर लगेचच चर्चा झाल्या. त्यांच्या म्हणण्याचा अर्थ काहीही असो, हे व्यवस्थेला दिलेलं आव्हान आहेच. कोणत्या अर्थाने? लोकशाही व्यवस्था स्वीकारलेला कोणताही समाज सामंजस्य, संवाद आणि सहिष्णुतेच्या तत्त्वावर चालणं अपेक्षित असतं. वैचारिक मतभेद हे वैचारिक संघर्षातून आणि विचारांच्या आदानप्रदानातून सोडवता येत असतात, यावर समाजातील विविध घटकांचा विश्वास असणं अपेक्षित असतं.

कौटुंबिक संस्कारांतून, शिक्षणातून, सार्वजनिक संस्थांतून, सामाजिक-राजकीय चळवळीतून हे मूल्य रुजवण्याचं काम त्यासाठीच चालु असतं. भारतीय परंपरेत आणि स्वातंत्र्योत्तर काळातही हे लोकशाही मूल्य रुजवण्याचा प्रयत्न व्यापकपणे होत आला आहे. त्यामुळेच आपल्या पूर्वजांनी आणि आपण सर्वांनी जी व्यवस्था निर्माण केली आहे (आणि करत आहोत) तिला या दोन हत्यांनी आव्हान दिलं आहे, ही गोष्ट खरीच आहे. या पार्श्वभूमीवर एका महत्त्वाच्या मुद्याचा शांतपणे विचार करण्याची वेळ आली आहे, असं वाटतं. हा मुद्दा म्हणजे, आपण जी व्यवस्था उभी केली आहे, तिचा ऐतिहासिक संदर्भ काय आहे? भारत हा देश १९४७मध्ये स्वतंत्र झालेला असला तरी हजारो वर्षांपासून इथे एक संस्कृती नांदत होती. इथे प्राचीन काळापासून लढाया आणि रक्तपात घडत असले तरी वाद-विवाद, खंडन-मंडन करून समाजात एकेका विचाराचं रोपण करण्याचा मार्गही प्रशस्त होत गेलेला आहे.

हिंदू धर्मातील विविध पंथ, परंपरा अशा देवाणघेवाणीतूनच साहचर्य करण्यास शिकल्या आहेत. बौद्ध धर्माने एक प्रचंड वैचारिक आव्हान उभं केल्यानंतर त्या काळी धार्मिक-सामाजिक मंथन झालं. पुढे मुस्लिम व ख्रिश्चन या दोन धर्मांचा इथल्या संस्कृतीशी संबंध-संघर्ष-संवाद घडला आणि सहअस्तित्वाचा मार्ग शोधला गेला. संघर्ष आणि संवाद या दोन्ही प्रक्रिया दीर्घकाळ चालु होत्या. आजचा भारतीय समाज आणि व्यवस्थेची पाळंमुळं या हजारो वर्षांच्या वाटचालीत आहेतच, परंतु १९व्या शतकात भारतात जे प्रबोधनपर्व आकाराला आलं, त्याच्याशी आजच्या व्यवस्थेचा अधिक निकटचा संबंध आहे. हे दोन कार्यकर्ते या प्रबोधनपर्वाचे पाईक असल्याने हा संदर्भ आज महत्त्वाचा बनतो.

१९वं शतक हे भारतासाठी धार्मिक-सामाजिक-सांस्कृतिक आणि राजकीय खळबळीचं पर्व होतं. या काळात आर्य समाज-ब्राह्मो समाज-प्रार्थना समाज-सत्यशोधक समाज अशा अनेक धार्मिक-सामाजिक चळवळी घडून आल्या. आपली पारंपरिक मूल्यं आणि इंग्रजांच्या संपर्कातून कळलेल्या पाश्चिमात्य मूल्यकल्पना यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न झाला. त्यातूनच आधुनिक शिक्षण, जातिभेद, अस्पृश्यता निर्मूलन, स्त्री-पुरुष समानता, धर्मसुधारणा आदी मुद्दे महत्त्वाचे बनले. महाराष्ट्रापुरतं बोलायचं, तर लोकहितवादी, महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, आगरकर, लोकमान्य टिळक, गोपाळ कृष्ण गोखले, इतिहासाचार्य राजवाडे, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, छत्रपती शाहू महाराज, स्वातंत्र्यवीर

सावरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदी महत्त्वाच्या सुधारक-विचारवंत-क्रांतिकारकांनी महाराष्ट्राचं मानस शंभर-दीडशे वर्षांच्या काळात ढवळून काढलं. या सर्व विचारमंथनातून स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रीय समाज घडला आहे.

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीवर, महात्मा गांधींच्या नेतृत्वावर आणि सरतेशेवटी भारतीय राज्यघटनेवरही या प्रबोधनपर्वाचा परिणाम झालेला आहे. त्यामुळे या प्रबोधनपर्वात या सर्वच थोरा-मोठ्यांचा आणि त्यांच्यामार्फत विविध विचारप्रवाहांचा सहभाग राहिलेला आहे. याचा अर्थ आपल्या आजच्या समाजाचा आणि व्यवस्थेचा पिंड या सर्वांच्या आग्रहातून आकाराला आला आहे. संघर्ष आणि संवाद या दोन्ही मार्गांतून ही प्रक्रिया घडून आलेली आहे. हीच प्रक्रिया स्वातंत्र्योत्तर काळानंतरही चालु राहिलेली आहे. मात्र, पूर्वी ही प्रक्रिया १९व्या शतकात जशी सर्वस्वी सामाजिक होती, तशी ती राहिलेली नाही.

भारतीय समाजाची ओळख कोणत्या वैचारिक मूल्यांच्या आधारे घडावी, याचा निर्णय आता राजकारणाच्या मैदानात होतो आहे. त्यामुळेच सत्तेवर कोणता पक्ष यावा, विधिमंडळात कोणते कायदे बनावेत, नोकऱ्यांमध्ये कुणाला आरक्षण मिळावं (किंवा मिळू नये) असे अनेक मुद्दे हे अटीतटीचे बनले आहेत.

राजकीय विचार आणि राजकीय सत्ता या दोन बाबींचा संदर्भ त्याला आता घट्टपणे जोडला गेला आहे. भारतीय समाजाची ओळख कोणत्या वैचारिक मूल्यांच्या आधारे घडावी, याचा निर्णय आता राजकारणाच्या मैदानात होतो आहे. त्यामुळेच सत्तेवर कोणता पक्ष यावा, विधिमंडळात कोणते कायदे बनावेत, नोकऱ्यांमध्ये कुणाला आरक्षण मिळावं (किंवा मिळू नये) असे अनेक मुद्दे हे अटीतटीचे बनले आहेत. हे मुद्दे पाहता पाहता संघर्षाचं रूप धारण करत आहेत आणि वेळप्रसंगी हिंसकही बनत आहेत. सामाजिक मुद्दे हे त्यामुळे झटकन राजकीय बनतात आणि जे घटक त्यामागे राजकीय शक्ती उभी करू शकतात, ते इतरांवर मात करू शकतात. या राजकीय मारामारीत निव्वळ सामाजिक मुद्दे उपस्थित करणाऱ्यांचा पराभव निश्चित ठरलेला असतो. गेल्या दहा-वीस वर्षांच्या काळात तरी हीच गोष्ट पुनःपुन्हा सिद्ध होत आहे.

दाभोलकर असोत अथवा पानसरे, हे दोघंही प्रामुख्याने सामाजिक मुद्यांच्या अनुषंगाने समाजाचं प्रबोधन करू पाहत होते. दाभोलकरांच्या मागे संस्था-संघटना असल्या आणि पानसरेंच्या पाठीशी राजकीय पक्ष असला, तरी त्यांचं बळ फारच क्षीण होतं. त्यामुळे ज्यांच्या पाठीशी राजकीय शक्ती आणि त्याचं बळ नसेल, त्यांची विचारांची-प्रबोधनाची-सामाजिक शिक्षणाची लढाई अपयशीच ठरणार, असं वातावरण महाराष्ट्रात तूर्त दिसत आहे. १९व्या शतकातील प्रबोधनपर्वात एकेकटा माणूस आपापली भूमिका रेटू शकत होता. त्यामुळेच विचारप्रसारासाठी कुणी दैनिक काढत होता, तर कुणी संस्था स्थापन करत होता. कुणी विचारमाला चालवत होता, तर कुणी पुस्तकं लिहीत होता. इतरांचा त्याला विरोध होता, परंतु जिवे मारण्यापर्यंत क्वचितच प्रसंग आला.(असं मोठं उदाहरण महात्मा गांधींचं.) आता मात्र प्रबोधनाला राजकीय शक्तीचं पाठबळ अनिवार्य झाल्यामुळे निव्वळ प्रबोधन आणि समाजसुधारणेचा आग्रह टिकू शकत नाही. तसा प्रयत्न कुणी केलाच तर त्याचा दाभोलकर-पानसरे होतो, ही गोष्ट स्पष्ट झाली आहेच. शिवाय, या प्रयत्नांना ना आता सरकारचं संरक्षण राहिलं आहे, ना समाजातील शिकल्या-सवरलेल्या लोकांचा भरघोस पाठिंबा. त्यामुळे प्रबोधनकारांची अवस्था एकांड्या शिलेदारासारखी झाली आहे. या दोघांचे मारेकरी कोण आहेत, हे आपल्याला माहीत नसलं तरी, आपल्या सामाजिक जीवनाची ही स्थिती आहे, हे कसं नाकारता येईल?

'दिव्य मराठी'च्या सौजन्याने

suhas.kulkarni@uniquefeatures.in

•••

# आरोग्य व्यवस्थेचा पंचनामा

*डॉ. भालचंद्र कानगो*

पुस्तक परीक्षण आरोग्य समाजकारण

वैद्यकीय क्षेत्रातील विविध तज्ञांच्या मुलाखती घेऊन आणि तत्संबंधी संकलन व लेखन करून डॉ. अरुण गद्रे यांनी कैफियत या छोटेखानी पुस्तकात देशातील आरोग्य व्यवस्खथेची झाडाझडती घेतली आहे. या पुस्तकातील 77 डॉक्टरांची स्वगतं, म्हणजे अस्तंगत होणाऱ्या जातीने जणू आपल्या रक्षणासाठी मारलेल्या हाकाच आहेत. हे पुस्तक वाचून सामाजिक आरोग्य क्षेत्रात काम करणारे कार्यकर्ते, संघटना, राजकीय दबाव वाढत जाईल व अंतिमतः बेलगाम खाजगी वैद्यकीय क्षेत्रावर नियंत्रण आणता येईल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

डॉ. अरुण गद्रे यांनी भारतभर हिंडून तब्बल 77 डॉक्टरांच्या मुलाखती घेतल्या आहेत. हे डॉक्टर मोठ्या, छोट्या व ग्रामीण भागांतील आहेत. यातील फक्त 7 डॉक्टर हे खाजगी प्रॅक्टीस न करणारे आहेत. मुलाखत दिलेल्या डॉक्टरांपैकी 33 डॉक्टरांनी आपली नावंही जाहीर करण्यास परवानगी दिली आहे. या मुलाखतीच्या आधारेच डॉ. अरुण गद्रे यांनी वैद्यकीय क्षेत्राचा धांडोळा घेतला आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या दाव्यानुसार गेल्या काही वर्षात खाजगी आरोग्य सेवावर अमाप खर्च करावा लागल्यामुळे दरवर्षी 3.5 टक्के (40 लाख) लोक दारिद्र्यरेषेखाली ढकलले जातात. भारतात वैद्यकीय शिक्षणावर नियंत्रण ठेवणारी एम.सी.आय. ही संस्था गेल्या 10 - 15 वर्षांपासून भ्रष्टाचार बेकायदेशीर व्यवहार, खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांना दिलेल्या विशेष प्रोत्साहनामुळे गाजत आहे व संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या संपत्तीविषयी, व्यवहाराविषयी सुरस चमत्कारिक घटना जगप्रसिद्ध झाल्या आहेत. आय. एम. ए. (इंडियन मेडिकल असोसिएशन) सारख्या संघटनांचा कारभार हा आरोग्य व्यवस्थेतील अनागोंदी, भ्रष्ट व्यवहार व भीषण वास्तवाचं उत्तम उदाहरण आहे.

आरोग्य व्यवस्थेतील सरकारचं स्थान नेमकं काय, हा आता चर्चेचा विषय झाला आहे. जगभरच आरोग्य व्यवस्था खाजगी असावी की सरकारी, की खाजगी-सरकारी सहभागाची, अशी चर्चा होत आहे. क्युबामध्ये सार्वजनिक आरोग्य व्यवस्था चांगली व परवडणारी आहे, असा अहवाल जागतिक आरोग्य संघटनेने दिला आहे. इंग्लंडमध्येही तशीच परिस्थिती आहे. ही सेवा सर्वांकडून करवसुली करून दिली जाते. मात्र आता ती खाजगी करावी म्हणून बहुराष्ट्रीय कंपन्यांचा दबाव वाढत आहे.

आरोग्यसेवा ही व्यवसायात बदलत आहे. औषध कंपन्या, तंत्रज्ञान पुरविणा-या कंपन्या व शिक्षण देणारे व्यावसायिक व खाजगी हितसंबंधांना बांधील असलेली सरकारं यामुळे हे रूपांतर झपाट्याने होत आहे. विमा कंपन्यांना आरोग्य विमा ही मोठी संधी असल्यामुळे त्यांचाही वैद्यकीय क्षेत्राच्या खाजगी करणासाठीचा दबाव मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. हा व्यवहार जागतिक पातळीवर सर्वत्र दिसून येत आहे.

नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेत प्रभाव पाडला, म्हणून सातत्याने गाजावाजा केला जातो. पण त्यांच्या अमेरिका वारीनंतर भारतातील अनेक औषधांचे दर अमेरिकन कंपन्यांच्या फायद्यासाठी वाढविण्यात आल्याचे वास्तव मात्र सांगण्यात येत नाही. अशा पध्दतीने आरोग्यसेवा महाग होणं, लोकांना ती न परवडणं, नफ्यासाठी अयोग्य पध्दतीने व्यवहार होणं, फसवणूक होणं हे प्रकार वाढत आहेत आणि या सर्वांचा आँखो देखा हाल म्हणजे 'कैफियत' हे पुस्तक. म्हणूनच आरोग्य व्यवस्थेचा, डॉक्टरांचाच केलेला पंचनामा, असं या पुस्तकाचं वर्णन करावं लागेल.

मी विद्यार्थी असताना डॉ. अरुण लिमये यांचं 'क्लोरोफॉर्म' हे पुस्तक आलं होतं. त्यात वैद्यकीय व्यवसायातील तत्कालीन गैरप्रकार डॉ. अरुण लिमये यांनी उघड केले होते. त्यावर बरीच चर्चाही तेव्हा झाली होती. मात्र त्या पुस्तकातील गैरप्रकार सौम्य वाटावे, अशी भयानक आणि गंभीर माहिती 'कैफियत' मध्ये आहे. वैद्यकीय सेवेसारख्या गंभीर क्षेत्रात गैरप्रकार करण्यात आपण किती प्रगती केली आहे, याचा पुरावाच डॉक्टरांनी या पुस्तकात दिला आहे.

प्रश्न, स्थिती वा वास्तव वर्मनाचा नाही तर ही स्थिती वा वास्तव सुधारण्याचा आहे, बदलण्याचा आहे. हे काम फक्त राजकीय पक्ष व शासनाचे नाही, तर समाजातील सर्व घटकांचे आहे. आरोग्य सेवेतील सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे डॉक्टर व

त्यांच्या संघटना, वैद्यकीय महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी व सर्वात शेवटी आरोग्याशी संबंधित ग्राहक यांचं ते कर्तव्यच आहे. या सर्वांनी हे पुस्तक वाचायला हवं!

**कैफियत**
लेखक: डॉ. अरुण गद्रे
प्रकाशक: मनोविकास प्रकाशन, पुणे
पृ. सं : 100 , किंमत : 100 रु

'महाराष्ट्र टाइम्स'च्या सौजन्याने

●●●

# "विचारां"चा विचार

*प्रसन्नजीत माने*

(प्रा. दि.य.देशपांडे यांच्या विवेकवादास...)

कधी आला आहे का तुझ्या मनात असा विचार,
विचार...की करू यात आता विचारांचा संचार, विचारांचा विचार!

जेव्हा वास्तवतेचा आधार देतोस तू डावलुन, तेव्हा उरतात ते फक्त अनिर्बंध, निराधार तर्क
अन मग त्यातून येतात जन्माला पूर्वजन्म, पुनर्जन्म, ईश्वर, स्वर्ग आणि नरक!

का ठेवतोस तू अशा संकल्पनांवर विश्वास ज्याला नाही काही पाया,
अन दुर्दैवाला कोणत्या आधारावर म्हणतोस तू "भूत का साया"?

जर करत बसलास तू मागचा-पुढचा जन्म, पाप अन पुण्य,
तर या निराधार विचारात करून घेशील हे मिळालेले जीवनही नगण्य!

कधी विचारलं आहेस का स्वत:ला,
की तू का ठेवतोस अशा गोष्टींवर विश्वास, न करता काही विचार...
अरे कर काहीतरी उपयोग त्या बुद्धीचा...नको होऊस असा लाचार!

तूच टाकतोस तुझ्या संकटात भर जेव्हा पाळतोस अंधश्रद्धा...
अन कुठे आहे पुरावा म्हणायला की जगण्यासाठी आवश्यक आहे ईश्वरावरील श्रद्धा?
कधी केले आहेत का तू उलट प्रश्न धर्मग्रंथातील तत्त्वज्ञानावर?
जेव्हा बघशील करून, कशी येईल बघ त्यातील तथ्यातथ्यता उघड्यावर!

नको रे, नको जाऊस शरण त्या निराधार अध्यात्माला...
नको जाऊस शरण त्या काल्पनिक संकल्पनांना, ज्या म्हणतील आम्ही शांत करू तुझ्या 'आत्म्याला'!

मुळात, जेव्हा तू लागतोस मागे करून घ्यायच्या मोक्षप्राप्ती,
तेव्हा वास्तवता, वैज्ञानिकता, तर्कशुद्धता यातून करून घेतोस तू 'मुक्ती'...

का लागू देतोयस तुझ्या चिकित्सक बुद्धीला अशी बुरशी,
जेव्हा करशील तू त्याचा उपयोग, अशा अविवेकतेशी लढायला बघ कशी येईल चुरशी...!

नको लागून देऊस गंज, अरे कर जरा वापर तुझ्या बुद्धीचा,
कर जरा वापर तुझ्या विवेकशक्तीचा, कर जरा वापर तुझ्या विवेकशक्तीचा...!

अवास्तव, अवैज्ञानिक गोष्टींना हात देऊन नको लावून घेऊस तू आपली 'वाट'...
घे वास्तवतेची, विज्ञानाची, विवेकतेची साथ...
बघ कशी येईल सम्यक सुखासमाधानाची लाट,
बघ कशी येईल सम्यक सुखासमाधानाची लाट!

(**'सम्यक सुखसमाधान'**: हा शब्द विवेकनिष्ठ मानासोपचारशास्त्राला अभिप्रेत असणाऱ्या 'Healty Emotions' या इंग्रजी शब्दाचा प्रतिशब्द म्हणून वापरला आहे.)

prasannajeetmane94@gmail.com

•••

नमस्कार,

'आजचा सुधारक' च्या संकेत स्थळावर आपले मनःपूर्वक स्वागत.

गूगल सर्च वर www.aajachasudharak.in कॉपी पेस्ट केल्यास संस्थळ उपलब्ध होईल.

हे संस्थळ लेखक व वाचकांच्यासाठी पुरोगामी विवेकवादी विचारांना उत्तेजन देणाऱ्या व्यासपीठाच्या स्वरूपात असेल. या विचारांचे लेख, चर्चा, प्रतिसाद यांचा समावेश यात असून त्यांचे येथे स्वागत होईल.

**मुख्यपाना**बरोबर **मनोगत, लेखकसूची**, **विषयसूची**, **विशेषांक, ग्रंथसूची, मागील अंक** इत्यादी सदर या संस्थळावर आहेत**.**

छापिल मासिकाप्रमाणे दर महिन्याला नवीन लेखांची भर **नवीन लेख** या सदराखाली येत राहतील. लेखावरील प्रतिसादांचे स्वागत होईल. कृपया संपर्कात उल्लेख केलेल्या ई- पत्त्यावर आपल्या सूचना, प्रतिसाद पाठवावे व संस्थळाच्या उद्दिष्टाशी पूरक असे लेख पाठवावीत, ही विनंती.